# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २७/१०/२००५

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक २७/१०/२००५ रोजी सभा सुचना क्र. १६ दि. २१/१०/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मोहन पाटील हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. मिलन गोविंदराव पाटील | सदस्य |
| ५) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ६) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ७) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ८) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ९) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| १०) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ११) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| १२) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| १३) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| १४) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |

**<u>गैरहजर सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| २) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |

**मा. सभापती :-**

मा. उपायुक्त श्री. अशोककुमार रणखांब सोा., सर्व खात्याचे मा. उपायुक्त, प्रशासन अधिकारी, सर्व उपस्थित असलेले नगरसेवक, नगरसेविका, माजी सभापती श्री. मोहन पाटील आणि मनपा कर्मचारी वर्ग मी आपणा सर्वांचे या ठिकाणी हार्दिक स्वागत करतो. ही स्थायी समितीची सभा चालवण्यासाठी आपण सर्वांनी सहकार्याची भावना बाळगून मला सहकार्य करायचे आहे. व ही स्थायी समितीची सभा गुण्यागोविंदाने पार पाडायची आहे. तसेच, आपणा सर्वांना रमजान ईद, दिवाळी आणि नविन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा देतो. आपणा सर्वांना रमजान ईद, दिवाळी आणि नविन वर्ष सुखसमृध्दी आणि आनंदाचे जावो ही सदिच्छा. प्र. सचिवांनी सभेला सुरुवात करावी अशी मी त्यांना सुचना करतो.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**गजानन भोईर :-**

मा. सभापती साहेब, मिटींगला सुरुवात करण्यापूर्वी आपण स्टेमबाबत चर्चा करणे योग्य आहे असे मला वाटते. कारण आज कमीत कमी एक महिन्यापासून संपूर्ण शहरामध्ये पाण्याचा प्रॉब्लम आहे. तुमच्या प्रभागात पाण्याचा प्रॉब्लम आहे की नाही ते मला माहित नाही. आपण सर्व स्थायी समितीचे सदस्य पाणी कमी येण्याची विचारणा करण्यासाठी स्टेमकडे जाऊया. आपले अधिकारी पत्रव्यवहार करतात तरी ती लोक त्यांच्या पत्राचे उत्तर देत नाहीत. संपूर्ण मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये पाण्याचा प्रॉब्लम आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

आज मिरा भाईंदरमध्ये चोविस किंवा अठ्ठेचाळीस तासानंतर पाणी येते.

**रतन पाटील :-**

आज चाळीस ते अठ्ठेचाळीस तासानंतर मिरा भाईंदरचे पाणी येत आहे. सन्मा. सदस्य गजानन भोईर साहेबांनी पाण्याच्या तक्रारीबाबत चांगला मुद्दा उपस्थित केलेला आहे. कारण आपल्या क्षेत्रामध्ये पाणी येण्याचे प्रमाण अठ्ठेचाळीस तासांवर गेलेल आहे. आपल्या महापालिकेचे चोविस तासात पाणी द्यायचे ध्येय आहे. आपण मधल्या काळात चोविस ते तीस तासापर्यंत पाणी दिलेले आहे. परंतु, आज एक महिन्यापासून पाण्याची परिस्थिती बिकट आहे. लोक म्हणतात की पाणी ऐवढे भरपूर आहे की धरणे ओसंडून जात आहे. मग असे असताना पाण्याची कमतरता का जाणवत आहे?

**गजानन भोईर :-**

कधी पाईपलाईन फुटते.

**सुर्यकांत भोईर :-**

कधी पाईपलाईन फुटते, कधी पॉवर नसते हे काय लावलेले आहे? गणपतीलासुध्दा असाच प्रॉब्लम झालेला होता. गणपतीला कधी लाईट गेलेली होती, कुठे पाईपलाईन फुटलेली होती. आता दिवाळी येणर असल्यामुळे लाकांना पाण्याची आवशक्ता आहे.

**गजानन भोईर :-**

आता अशीच परिस्थिती असेल तर लोकांनी सणासुदीला पाण्याविना रहायचे का?

**डॉ. रमेश जैन :-**

पाण्याचा खुप प्रॉब्लम झालेला आहे.

**मा. सभापती :-**

आपण या ठिकाणी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत मी त्या भावनांशी सहमत आहे. ह्या विषयासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून चर्चा करावी लागेल.

**प्रेमनाथ पाटील :-**

आता सा ठिकाणी उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांनी निवेदन करावे.

**एस. ए. खान :-**

आपल्या स्टेमच्या अधिकाऱ्यांना इकडे बोलवा. आपले अधिकारीसुध्दा तक्रारी करतात. परंतु, स्टेमचे अधिकारी काहीही ऐकत नाहीत.

**सुर्यकांत भोईर :-**

आपल्या पाणी विभागाचे अधिकारी तक्रार करुनसुध्दा स्टेमचे अधिकारी त्यांचे थोडेदेखील ऐकत नाहीत.

**प्रेमनाथ पाटील :-**

तिकडे कोणता तरी सी.ई.ओ. आलेला आहे. तो अजिबात ऐकत नाही. त्याला काही समजत नाही. आपल्या स्थायी समितीचे सदस्य गेले तरी हाच प्रॉब्लम आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

आपले पेमेन्ट किंवा कुठली फी त्यांच्याकडे बाकी आहे का?

**गजानन भोईर :-**

प्रथम पाण्याचा मुद्दा घ्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. सहाजिकच तुम्ही चर्चा करायला पाहिजे.

**गजानन भोईर :-**

प्रथम ह्या पाण्याच्या प्रश्नावर चर्चा केल्यानंतर मिटींग घ्यायला हरकत नाही. वाटल्यास तुम्ही स्टेमच्या अधिकाऱ्यांना बोलवा.

**सुर्यकांत भोईर :-**

पाणी का येत नाही? हे विचारायला तुम्ही त्या अधिकाऱ्यांना बोलवा.

**प्रेमनाथ पाटील :-**

नगरसेवक तसेच तिकडच्या नागरिकांना पाणी न मिळाल्यामुळे त्रास सहन करावा लागत आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

आम्हा नगरसेवकांना नागरिकांना तोंड द्यावे लागत आहे. अधिकरी बोलतात की, काम चालू आहे.

**एस. ए. खान :-**

थोड्या दिवसांनी दिवाळी येणार आहे. ईद येणार आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

काय प्रॉब्लम आहे? तो आपण त्या अधिकाऱ्यांना विचारु शकतो. हे सणाचे दिवस आहेत शिवाय आता दिवाळी जवळ आलेली आहे.

**प्रभात पाटील :-**

सण तोडांवर असताना कोणताही नागरिक स्वस्थ बसणार नाही. कारण हा पाण्याचा प्रश्न आहे.

**रतन पाटील :-**

सणाच्या दिवसाला पाणी नको का?

**मिलन पाटील :-**

मा. सभापती साहेब, याच्या मागची काय भूमिका आहे ती तुम्ही स्पष्ट करुन घेतली का? याच्या मागची भूमिका अशी आहे की, आपल्याला याच्यापूढे या स्टेम प्राधीकरणाकडून त्रास होणार आहे. आणि त्रास संभवणार आहे. कारण ज्यावेळेला त्यांचे अधिकारी इकडे होते त्यावेळेला बरोबर ॲडजेस्ट करुन पत्राची उत्तरे द्यायचे आता आपण त्यांचे अधिकारी तिकडेच पाठवल्याने आपण आपले अधिकारी आपल्या अधिका-यांच्या पत्रांना फाटा मारतात असे माझे स्पष्ट म्हणने आहे. आपल्याला ते अधिकारी त्रास देणार आहेत. याच्यापूढे ते शट-डाऊन सुध्दा करणार आहेत. जोपर्यंत त्यांचे अधिकारी इकडे येत नाहीत तोपर्यंत ते अधिकारी आपल्या अधिका-यांना त्रास देणार आहेत. आपण ह्याची स्पष्ट दखल घ्यावी असे माझे म्हणने आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

ह्या स्टेम प्राधिकरणाकडून भिवंडी महानगरपालिकेला पाणी पुरविले जाते. मग आपल्या मिरा भाईंदर महापालिकेला पाणीपुरवठा का होत नाही.

**मिलन पाटील :-**

सर्व अधिका-यांनी मला स्पष्ट अनऑफिशियली सांगितले की, जापर्यंत आमचे अधिकारी येणार नाहीत तोपर्यंत मिरा भाईंदरची परिस्थिती सुधारणार नाही. कारण अधिकारी सक्षम आहेत.

**मिलन पाटील :-**

मिरा भाईंदर नगरपालिकेची महानगरपालिका झालेली आहे. परंतु, आपले अनेक धर्माचे सण म्हणजे होळी, नवरात्र असे अनेक सण असतात. या सर्व सणांमध्ये ऐनवेळेला पाणी बंद होते. हा नेहमीचा प्रकार आहे. सर्व सन्मा. सदस्यांची भूमिका तीव्र आहे. या सदनामध्ये प्रथम आपण एक सन्मा. सदस्य आहात नंतर मा. सभापती आहात. आम्हीसुध्दा प्रथम सदस्य आहोत आणि नंतर स्थायी समितीचे सदस्य आहोत. परंतु, हा जो वारंवार प्रकार होत आहे. या वारंवार होणा-या प्रकारामुळे असंतोष निर्माण होतो. त्यामुळे या ठिकाणी कुठलाही पक्षपात नाही. सर्वांना पाणी मिळाले पाहिजे आणि आपण सर्वांना पाणी देणे हे तुमच्या आणि आमच्या हातामध्ये नाही. कारण आपल्याला संपूर्ण स्टेमकडून पाणी मिळत आहे. स्टेमचा अधिकारी हा दुय्यम प्रश्न आहे. मी सर्व सदन आणि मा. सभापती साहेबांना विनंती करतो की, आपल्या सदनात श्री. शिवाजी बारकुंड यांच्याकडे संपूर्ण पाणी खाते आहे. या ठिकाणी सर्व सन्मा. सदस्यांनी तीव्र निषेध व्यक्त केलेला आहे. त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे. ऐन दिवाळीला पाणी नसल्यामुळे सर्वत्र असंतोष निर्माण झालेला आहे. मी सर्व सन्मा. सदस्यांच्यावतीने सांगतो की, आपण श्री. शिवाजी बारकुंड साहेबांना याबाबत स्पष्ट खुलासा करण्याचे निर्देश द्यावेत, जेणेकरुन सदस्यांना उत्तरे मिळतील. आपल्याला सन्मा. सदस्यांच्या प्रश्नांची उत्तरें देता येतील. हा खुलासा झाल्यानंतर आपण आपल्या सुचना मांडाव्यात.

**गजानन भोईर :-**

उत्तरे देऊन आणि सुचना मांडून प्रश्न सुटणार नाही. परंतु, आपण त्याच्यावर काय कार्यवाही करायची तेसुध्दा बघा.

**रतन पाटील :-**

स्टेमच्या अधिका-यांना एकदा दणका दाखविल्याशिवाय होणार नाही. हे अधिकारी फार माजलेले आहे.

**मा. सभापती :-**

त्या ठिकाणी काय झालेले आहे ते आपल्यालासुध्द माहिती आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

ते स्टेमचे अधिकारी आपल्या अधिका-यांना ऐकत नाही.

**मिलन पाटील :-**

मा. सभापती साहेब, तत्पुर्वी आपल्या या सदनामध्ये असा एक ठराव करा की, कितीही मोठी अडचण आली तर आपण जनरेटर लावू शकतो. त्यामुळे तुम्ही जनरेटर का खरेदी करीत नाही? तुम्ही जनरेटर लावला तर लाईट गेल्यावर काहीही फरक पडत नाही. आपल्याला जनरेटरमुळे लाईट मिळू शकते. त्यामुळे तुम्ही जनरेटर लावायला सांगा आणि तसा ठराव करुन घ्या.

**मा. सभापती :-**

सध्या काय परिस्थिती आहे? त्यामुळे आपल्याला तसा ठराव मांडता येत नाही. सन्मा. सदस्य मिलन पाटील तुम्ही आम्हाला सांगता की, मी सगळीकडे फिरुन आलेला माणूस आहे. तिकडे त्यांचे एवढे मोठे सम्प आणि पाईप आहेत. परंतु, आपण पॉवरशिवाय जनरेटरने पाणी वर खेचू शकत नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, हे रोजचे काम नाही. हे एर्मजन्सी काम आहे.

**गजानन भोईर :-**

आम्ही एर्मजन्सीच्या वेळेचे बोलतो.

**सुर्यकांत भोईर :-**

एर्मजन्सी असेल तेव्हा जनरेटरच्या पॉवरने पाणी वर उचलले जाईल.

**मिलन पाटील :-**

मोठ्या मोठ्या टाटा आणि बिर्लाच्या कंपन्या जनरेटरवर चालतात. जनरेटर पाणी खेचू शकत नाही असे तुम्ही कसे बोलता.

**एस. ए. खान :-**

अधिका-यांना याबाबत खुलासा करु दे.

**शिवाजी बारकुंड :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो की, आपल्याकडे अतिवृष्टीनंतर दि. ०१/८/२००५ पासूनचे स्टेटमेन्ट आहे. आपल्याकडे त्या तारखेपासून आजच्या तारखेपर्यंत वारंवार ८० टक्के पाणी कमी होत आहे. म्हणजेच जेवढे पाणी शट-डाऊन झाले त्यापैकी ८० टक्के पाणी पॉवर फेल्युअरमुळे झालेले आहे आणि २० टक्के शट-डाऊन पाईप फुटल्यामुळे झालेले आहे. या संदर्भात तात्कालीन मा. आयुक्त श्री. आर. डी. शिंदेसाहेब असल्यापासून स्टेमच्या मिटींगमध्ये श्री. आर. डी. शिंदे साहेबांनी आणि मी आम्ही दोघांनी पत्र दिलेले आहे की, हा वारंवार होणारा पाणीपुरवठा पॉवर फेल्युअरमुळे खंडीत होत आहे. त्या ठिकाणी एम.एस.सी.बी.चा एकच फिडर आहे आणि एकाच सबस्ट्रिशनमधून दोन-दोन फिडर घेतलेले आहेत. एका सबस्ट्रिशनमधून दहा फिडर घेतले तरी काहीही उपयोग होणार नाही. जर पॉवर फेल्युअरमुळे झाले तर दहाच्या दहा फिडर बंद होतात. आम्ही शहाड-टेमघर आणि पातलीपाड्याला ते सर्व दाखविलेले आहे की, वेगवेगळ्या ठिकाणावरुन टाटाचे फिडर घेण्याचा प्रस्ताव दिलेला आहे. दुसरा जनरेटरचा महत्वाचा मुद्दा आहे. एक हजार मोठे के.बी. चे जनरेटर बसवावे. मिरा भाईंदरला नुकसान होत आहे आणि पाणीसुध्दा मिळत नाही. कारण आपल्याला दुसरा सोर्स नाही. ठाणे, भिवंडीला दुसरा सोर्स आहे. परंतु, मिरा भाईंदरला स्टेमशिवाय दुसरा पर्याय नाही. आम्ही त्यांना सांगितले की, स्टेमकडे जवळजवळ रु. १५ कोटी शिल्लक आहेत. आपले् प्रस्ताव गेलेले आहेता या प्रस्तावाबाबत मा. महापौर, नविन आलेले मा. आयुक्त साहेब यांनीसुध्दा पत्र दिलेले होते. स्टेमच्या मागील २९ तारखेच्या मिटींगमध्ये जनरेटरचा विषय आला. परंतु, तेथील एग्झीक्युटिव्ह इंजिनियरने अंदाजे ढोबळमानाने किंमत दिलेली होती. ठाणे आयुक्तांनी त्या मिटींगमध्ये सांगितले की, याचा ऑपरेशन मेनटेनन्स कॉस्ट किती येईल? शहाड-टेमघर आणि पातलीपाड्यासाठी विचारणा केलेली होती. त्यांनी याबाबतची सविस्तर माहिती घेऊन हा विषय या मिटींगला ठेवतो असे सांगितले आहे. परंतु, त्यांनी अद्यापपर्यंत मिटींग लावलेली नाही. माझे रोज एग्झीक्युटिव्ह इंजिनियर श्री. कोळसे यांच्याबरोबर फोनवर बोलणे होते. ते बोलतात की, आम्ही २९ तारखेला मिटींग लावू. परंतु, मिटींगचा अजेन्डा अजूनपर्यंत आलेला नाही. जेवढे पाणी उचलले जाणार तेवढ्या कॅपेसिटीचे जनरेटर लावणार. ते जनरेटर उपलब्ध आहेत. आमच्याकडे त्या कंपनीचे लोक येऊन गेले.

**मिलन पाटील :-**

किर्लोस्करचे ५००० ते १०,००० के.व्ही. पर्यंतचे जनरेटर मिळतात.

**शिवाजी बारकुंड :-**

किर्लोस्कर जी आता नविन कमिंग इंडिया आलेली आहे. त्याची लोकसुध्दा आलेली आहे. दुसरी एक जनरेटर सेट नावाची कंपनी आहे. त्यांनी त्या कंपनीची फक्त ढोबळ माहिती दिलेली होती. याचा सर्वात जास्त मिरा भाईंदरला तोटा आहे. आपल्या प्रस्तावाला ठाणे कार्पोरेशनचा नेहमी विरोध होत असतो. आपण सर्व प्रस्ताव दिलेले आहेत. तरीसुध्दा आपण स्थायी समितीमध्ये ठराव देऊ. कारण मा. आयुक्त साहेब व मा. महापौर मॅडमचेसुध्दा पत्र आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, विद्युत पुरवठा वारंवार खंडीत होऊनच आपल्याला पाणी मिळत नाही. त्यांनी त्याची पर्यायी व्यवस्था करावी असे आपण दिलेले आहे.

**प्रभात पाटील :-**

याचा असा अर्थ आहे की, अधिकारी लेव्हलवर काहीही होत नाही, काही चालू देत नाही. त्यामुळे धडक मोर्च्याशिवाय पर्याय नाही. आपल्याला आपले डेलिगेशन गेले पाहिजे. आपण स्वतः प्रतिनिधी या नात्याने त्यांच्यापूढे गा-हाणी मांडली पाहिजेत. त्यांच्याशिवाय पर्याय नाही. जर एवढा पैसा असूनसुध्दा ते खर्च करायला मागत नाहीत. आपले अनेक प्रस्ताव त्यांच्याकडे पडून आहेत.

**रतन पाटील :-**

आपण दिवाळीनंतर मोर्चा घेऊ या.

**प्रभात पाटील :-**

मोर्चा दिवाळीनंतर न घेता दिवाळी अगोदर घ्या.

**रतन पाटील :-**

मग पाहणीसाठी शिष्टमंडळ दिवाळीनंतर येईल.

**शिवाजी बारकुंड :-**

माझी स्थायी समितीला अशी विनंती आहे की, आपण श्री. कोळसे साहेबांना भेटण्याऐवजी स्टेम प्राधीकरणाचे अध्यक्ष ठाणे महापौर श्री. विचारे साहेब यांच्याशी भेट घेऊ आणि ठाणे कमिशनर, सदस्य, सचिव यांच्याशीसुध्दा भेट घेऊन मार्ग निघेल. आपल्याला श्री. कोळसे साहेबांना भेटून काहीही उपयोग होणार नाही. ते बोलणार की मिटींगमध्ये प्रस्ताव ठेवतो. परंतु, ते काहीही माहिती देणार नाहीत. आपला प्रस्ताव गेल्या पाच महिन्यापासून चालू आहे. मागच्या मिटींगमध्ये साहेबांनी दम दिला म्हणून त्यांनी फक्त पत्र ठेवले. मिरा भाईंदरचे मा. महापौर आणि मा. आयुक्त साहेबांकडून जनरेटर सेट बसविण्याबाबत फक्त पत्र आलेले आहे. त्यांनी फक्त जुनी माहिती दिलेली आहे. त्यामुळे तो प्रस्ताव मंजूर झालेला नाही. आपण जर श्री. विचारे साहेब आणि श्री. सेठीसाहेबांना भेटल्यावरच पुढचा मार्ग निघू शकतो.

**एस. ए. खान :-**

तुम्ही त्यांची अपॉईन्टमेन्ट घ्या.

**प्रभात पाटील :-**

मा. सभापती साहेब, मा. महापौर, मा. सभापती, आणि स्थायी समितीचे सन्मा. सदस्य असे मिळून त्यांची एक अपॉईन्टमेन्ट फिक्स करु.

**एस. ए. खान :-**

अशी एक अपॉईन्टमेन्ट ताबडतोब फिक्स करु.

**मा. सभापती :-**

त्यांचा टाईम घ्या. त्यांच्या अधिकाऱ्यांना बोलवा.

**एस. ए. खान :-**

उद्याच्या उद्या दुपारचा टाईम घ्या.

**प्रभात पाटील :-**

आपल्या सचिव लेव्हलवर वेळ ठरवून घ्या.

**मिलन पाटील :-**

प्रथम त्यांना पत्रव्यवहार करुन त्यांचे टायमिंग घ्या. जर त्यांनी ऐकले नाही तर सर्व सन्मा. सदस्यांनी त्यांना घेराव करा.

**एस. ए. खान :-**

उद्या सकाळचे टायमिंग घ्या.

**गजानन भोईर :-**

आपण जर उद्या गेलो तर त्याच्या कार्यवाहीत ताबडतोब फरक पडेल. उद्याच्या उद्या टायमिंग घ्या.

**एस. ए. खान :-**

उद्या सकाळचे टायमिंग घ्या. कारण आपल्याला संध्याकाळी जायचे आहे.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १२७ चे वाचन केले.)

**कैलासबेन जानी :-**

मा. सभापती साहेब, प्रभाग समितीची सभासुध्दा आजच ठेवलेली आहे आणि आपल्या स्थायी समितीची सभासुध्दा आजच आहे. आम्ही तिकडे जाऊ शकत नाही. आपण जर अशा सभा घेऊ तर कसे चालेल.

**गजानन भोईर :-**

या ठिकाणी वेळेचा ताळमेळ होत नाही. कारण मागच्या वेळेला प्रभाग समितीची सभा स्थायी समितीच्या सभेच्या वेळेला ठेवली होती.

**कैलासबेन जानी :-**

जर स्थायी समितीची सभा आज असेल तर आज प्रभाग समितीची सभा ठेवायला नको होती. आम्ही दोन्ही ठिकाणी एकदम जाऊ शकत नाही.

**डॉ. रमेश जैन :-**

पान क्र. १ वर सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे. परंतु, इसमे दशमा देवीके उत्सव को भी लिया जाये। यहॉपर दिया जाय लिखा उसके जगह लिया जाय चाहिए।

**प्रभात पाटील :-**

पान क्र. ५ वर जो ठराव झालेला आहे. त्याचे काय झाले? ती एक वर्षाची एजन्सी नेमून केलेली आहे का?

**दिपक खांबित :-**

त्याबाबतचे टेन्डर आल्यावर मंजूरी मिळेल.

**मोहन पाटील :-**

दि. २७/९/२००५ च्या प्रोसिडिंगवरील पान क्र. १२ आहे. आपण तेवढा भाग नंतर मंजूर करुन घेऊया.

**प्र. सचिव :-**

मी आता दि. २७/९/२००५ च्या इतिवृत्तांताचे वाचन करतो.

(सन्मा. सदस्य मोहन पाटील ह्यांनी ठरावाचे सभागृहात वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १२७ :-**

दि. २६/०८/२००५, दि. २६/०८/२००५ (तहकुब) व दि. २७/०९/२००५ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १३४ :-**

दि. २६/०८/२००५, दि. २६/०८/२००५ (तहकुब) व दि. २७/०९/२००५ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. मोहन मधुकर पाटील.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १२८ चे वाचन केले.)

**प्र. सचिव :-**

प्रभाग समिती क्र. ०४ कडून शिफारस केलेला ठराव आहे.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती महोदय, आपण या ठिकाणी प्रभाग समित्या सुरु करुन डिसेन्ट्रलाईज काम करण्याचे प्रशासनाचे एक चांगले कार्य केलेले आहे. मा. महापौर, मा. उपमहापौर व सर्व पदाधिकारी या सर्वांनी ही प्रभाग समिती काम डिसेन्ट्रलाईज होऊन वाढवावी. तसेच, सर्व विकेंद्रीकरण झाले पाहिजे. अशा पध्दतीचे काम या ठिकाणी केलेले आहे. या ठिकाणी त्या माध्यमातुन नवनवीन सुचना येत आहेत. आपण प्रभाग समित्यांना रु. २ कोटीची तरतुद केलेली आहे. आपल्याला त्याचे रिॲप्रोचमेन्ट पुढच्या मिटींगला येणार आहे. त्या भागातील सर्व नगरसेवकांची कामे सुरळीत पार पडतील. असा आपला एक मनोदय होता आणि त्या पध्दतीने काम सुरु झालेले आहे. आज या ठिकाणी प्रभाग समित्यांकडून तीन विषय आलेले आहे. आपण जेव्हा एखादा विषय स्थायी समितीमध्ये घेतो आणि आपण तो विषय घेऊन ठराव करतो. आपण त्याचा ठराव केल्यानंतर त्याची शिफारस महासभेला करतो. त्यावेळी मा. महासभा त्याबाबतचा एक छोटासा गोषवारा देते. तो गोषवारा दिल्यानंतर तो विषय त्या ठिकाणी मंजूरीला ठेवला जातो किंवा त्याचा प्रस्ताव केला जातो त्याप्रमाणे आज त्या सर्व प्रभाग अध्यक्षांनी प्रभाग समितीचे कामकाज सुरु केले. मी त्याबद्दल त्यांचे या ठिकाणी प्रथम अभिनंदन करतो. त्या सर्व आदेशाचे आणि त्या सर्व समितीच्या सन्मा. सदस्यांचे अभिनंदन करतो. कारण या ठिकाणी त्यांचे चांगले प्रस्ताव आले पाहिजेत. या ठिकाणी चांगले प्रस्ताव दिलेले आहेत. परंतु, आपल्या स्थायी समितीकडे विषय आल्यानंतर त्या ठिकाणी स्थायी समितीचा स्वतःचा गोषवारा येणे आवश्यक आहे. तो गोषवारा आल्यानंतर त्या गोषवाऱ्यामध्ये असलेली त्या बजेटची तरतुद, त्याच्यामध्ये कामाच्या ज्या काही प्रस्तावित सुचना असतील त्या सुचना वगैरे अशा अन्य गोष्टींचा त्या गोषवाऱ्यामध्ये आशय घेतला जातो. आपण त्या पध्दतीने गोषवाऱ्याचा आभ्यास करुन, त्या गोषवाऱ्यार विचार विनिमय करुन, सन्मा. सदस्यांच्या सुचना घेऊन आपण तो गोषवारा मंजूर करुन त्याबाबतचे काम मंजूर करु शकतो. परंतु, आज या ठिकाणी प्रथमच विषय आलेले आहेत. मी. मा. सभापती महोदय, या ठिकाणचे मा. उपायुक्त (मु.) आणि सचिवांना विनंती करतो की, असे विषय आल्यानंतर आपल्याकडे या विषयाचा गोषवारा असणे आवश्यक आहे. या ठिकाणी लेखापरिक्षक उपस्थित आहेत. त्यांच्या बजेटची किती तरतुद आहे? काय आहे? याची आपल्याला संपूर्ण माहिती मिळाली तर आपल्या सर्व सन्मा. सदस्यांना त्या विषयाला मंजूरी देणे सोपे जाईल. ते विषय मंजूर झाले पाहिजे. असा सर्वांचा मनोदय आहे. या ठिकाणी तिन्ही विषयाचे गोषवारे आलेले नाहीत. गोषवारे येणे अत्यंत जरुरी आहे. यासाठी आपण गोषवाऱ्यासहीत विषय आणावेत. असे मी सन्मा. सदस्यांच्यावतीने मा. सभापती महोदय आणि मा. उपायुक्त (मु.) यांना विनंती करतो की विषयामध्ये कोणताही संशय असण्याचा प्रश्न येत नाही. हे चांगले विषय आहेत. ते विषय झाले पाहिजेत. या विषयाला आपला गोषवारा असणे फार जरुरी आहे. आपण या ठिकाणी गोषवारे आणून विषय आणावेत. अशी मी सभागृह आणि प्रशासनाला विनंती करतो.

**रतन पाटील :-**

मा. सभापतींच्या परवानगीने बोलतो की, आपल्या मागच्या स्थायी समितीच्या वेळेला हा विषय होता की, मिरा भाईंदरच्या विकास आराखड्यामध्ये जेवढी आरक्षणे आहेत, ती विकास करण्यासाठी व हस्तांतरित करण्यासाठी तशा पध्दतीचे सगळे नोटिफिककेशन काढलेले आहे आणि आपण तशा पध्दतीने कामसुध्दा दिलेले आहे असे मला वाटते. परंतु, आज जो आरक्षण क्र. ३५३ आहे, हा आरक्षण क्रमांकसुध्दा त्या विकास आराखड्यामध्ये आहे म्हणजे त्या कामाची पुर्तता झालेली आहे आणि होत आहे. उद्याने विकसित व्हावी. एकच उद्यान व्हायला पहिजे असे नाही. मिरा भाईंदरमध्ये असलेली उद्याने व मैदाने विकसित व्हायला पाहिजेत. परंतु, मिरा भाईंदर विभागातील असे काही विषय आहेत किंवा अशी काही उद्याने व मैदाने आहेत. तो विषय एकत्रितरित्या आणावा. तुम्ही एकच विषय सभेपुढे आणू नका. आता सन्मा. सदस्य मोहन पाटील बोलले की, आपल्याला आपला गोषवारा मिळाला पाहिजे. या ठिकाणी प्रभाग समितीन गोषवारा दिलेला आहे. त्यांनी या ठिकाणी त्यांचे पत्र दिलेले आहे. त्यांनी त्या संदर्भात कुठे पत्रव्यवहार केलेला आहे का?

**मा. सभापती :-**

आपल्याकडे प्रशासनाचा गोषवारा नसल्यामुळे आपण हे विषय घेणार नाहीत. आपण त्याचा विचार पुढे करुया.

**रतन पाटील :-**

पुढच्या वेळेला विचार करा. कारण आपण आरक्षणे ताब्यात घेण्यासाठी पुढे विषय घेतलेला आहे.

**मा. सभापती :-**

सचिवांनी याकडे लक्ष द्यायला पाहिजे. प्रभाग समित्यांमध्ये झालेले विषय परत घेत असतील तर आपल्याला त्याचा विचार करावा लागेल. हा आराखड्याचा विषय मागच्या सभेत झालेला होता. तरीसुध्दा हा विषय आपल्याकडे त्यांच्याकडुन परत आलेला आहे.

**गजानन भोईर :-**

हा सदर विषय अमुक अमुक स्थायी समितीच्या सभेत आला होता. त्याच्यावर चर्चा झालेली होती. त्यांचा पत्रव्यवहार चालू आहे. अशा प्रकारचे पत्र सचिवांनी प्रभाग समितीला द्यायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

म्हणून आपण हा विषय पुढच्या वेळेला घेऊ या.

**गजानन भोईर :-**

ती शिवार गार्डनची मागची जागा आहे. त्यांचा पत्रव्यवहार चालू आहे.

**प्रभात पाटील :-**

प्रभाग समितीचे सर्व प्रस्ताव सचिवांकडे येतात का?

**प्र. सचिव :-**

हे तीन ठराव आहेत. हे स्थायी समितीकडे शिफारस करण्यासाठी असा उल्लेख आहे.

**प्रभात पाटील :-**

हे ठराव तुमच्याकडे आलेले आहेत. तुम्ही महासभा आणि स्थायी समितीचे सचिव आहात. त्यामुळे स्थायी समितीला कोणते विषय झाले? महासभेला कोणते आरक्षण पास झाले? जर तुम्हाला याचा मेळ जमला असता तर हा विषय या ठिकाणी येण्याची गरज नव्हती. महासभेला सर्व आरक्षित क्रमांकांना मंजूरी दिलेली आहे. त्यामुळे हा विषय प्रभाग समितीकडून स्थायी समितीला येण्याची गरज नव्हती. कारण या विषयाला ऑलरेडी मंजूरी मिळाली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रभाग समितीला पॉवर्स दिलेली आहे.

**प्रभात पाटील :-**

प्रभाग समितीला पॉवर्स दिलेली आहे. हा विषय महासभेने घेतलेला आहे. या विषयाला महासभेची मंजूरी आहे.

**रतन पाटील :-**

हा विषय मागच्या स्थायी समितीला आलेला होता.

**मिलन पाटील :-**

मा. सभापती साहेब, त्या प्रभागाचे जे कोणी अध्यक्ष आहेत, तुम्ही त्यांचे म्हणने ऐकून घ्या.

**प्रभात पाटील :-**

तो विषय त्या ठिकाणी मंजूर झालेला असल्यामुळे तो विषय पुन्हा या ठिकाणी येण्याचे कारण नाही.

**रतन पाटील :-**

तो विषय तसा नाही.

**मिलन पाटील :-**

या ठिकाणी त्या प्रभागाचे अधिकारी हजर आहेत. तुम्ही त्यांना विचारा. त्यांचे काय म्हणने आहे ते ऐकून घ्या. हा विषय कशाला पाठविला ते तुम्ही अधिका-यांना विचारा.

**प्रभात पाटील :-**

प्रभाग अधिका-यांना उत्तर द्यायला सांगा.

**अजित पाटील :-**

आजच्या सभेपुढे प्रभाग समितीचे जे विषय आलेले आहेत. त्याबाबत प्रभाग समितीमध्ये सन्मा. सदस्यांनी ज्या सुचना केलेल्या होत्या, त्या सुचनेनुसार प्रभाग समितीच्या बैठकीत चर्चा झालेली होती. प्रभाग समितीच्या सन्मा. सदस्यांच्या सुचनेनुसार ठराव केलेले आहेत. त्या प्रभाग समितीने केलेल्या ठरावाच्या उचित कार्यवाहीसाठी मा. आयुक्तसाहेब, महासभा आणि स्थायी समितीच्या अध्यक्षांना ठराव सादर केलेले आहेत. सक्षम प्राधीकरणाने उचित कार्यवाही करावी यासाठी सभेपुढे ठराव सादर केलेले आहेत.

**मोहन पाटील :-**

श्री. अजित पाटील यांना कामाचा चांगला अनुभव आहे, त्याबाबत प्रश्नच नाही. आपण हा ठराव उचित कार्यवाहीसाठी पाठवलेला आहे. या ठरावावर उचित कार्यवाही झालेली आहे. अशा मताचे स्थायी समितीचे सभागृह आहे. त्यांचे सगळ्यांचे हेच मत आहे. परंतु, आपल्याकडून योग्यरितीने पुर्तता झालेली आहे. परंतु, जेव्हा एखादा विषय स्थायी समितीकडे येतो तेव्हा त्याबाबतचा गोषवारा स्थायी समितीकडे असणे अत्यंत आवश्यक आहे. सन्मा. सदस्य रतन पाटील, सन्मा. सदस्या प्रभात पाटील, सन्मा. सदस्य मिलन पाटील आणि सन्मा. सदस्य गजानन भोईर यांनी या ठिकाणी विचार मांडलेले आहेत. परंतु, आपण मध्यंतरी जी आरक्षणे विकसित करायची ठेवली होती, आपण त्या आरक्षणामध्ये प्राधान्य क्रमांक ठरविलेला होता. खांबित साहेब, आपली प्राधान्य क्रमांक ठरविण्याची किती आरक्षणे आहेत.

**दिपक खांबित :-**

आता आपली अकरा आरक्षणे आहेत.

**मोहन पाटील :-**

त्या अकरा रिझर्वेशनमध्ये एक रिझर्वेशन आहे का?

**दिपक खाबित :-**

नाही.

**मोहन पाटील :-**

हा विषय यासाठीच आपल्या विषयपटलावर आलेला आहे. आणि आपण तो विषय घ्यायला पाहिजे. त्याकरीता आपल्या बजेटमध्ये किती तरतुद आहे? याचा या ठिकाणी विचार झाला पाहिजे. समजा, एखादे पॉलिसी मॅटर असेल तर तो विषय महासभेपुढे गेला पाहिजे. आपण शिफारस करु शकतो. परंतु, ह्या विषयाचा गोषवारा शिफारस करण्यापूर्वी देणे क्रमप्राप्त ठरेल. सन्मा. सदस्यांनी या ठिकाणी त्यांचे मत मांडलेले आहे. आपण कामासाठी तत्पर असायला पाहिजे. या ठिकाणी हे विषय प्रभाग अधिका-यांकडून आलेले आहेत. यासाठी आपल्या सभागृहाचा गोषवारा असणे आवश्यक आहे. मी मा. सभापती महोदय आणि मा. उपायुक्त (मु.) यांना विनंती करतो की, आपण याच्यापुढे या विषयाचा गोषवारा देऊन विषय पुन्हा घ्यावा. आपण विषय घेतो परंतु, तो पॉलिसी मॅटरचा विषय असेल तर आपण त्या विषयाची महासभेला शिफारस करुया. हा विषय मागच्या महासभेत झालेला आहे. कोणतेही विषय पॉलिसी मॅटर असले तरी मा. स्थायी समिती त्या विषयाची शिफारस करु शकते. आपण त्याच्यासाठी हा विषय या ठिकाणी घेऊन जर हा विषय पॉलिसी मॅटर असेल तर आपण या विषयाची शिफारस करावी. जर हा विषय पॉलिसी मॅटर नसेल तर हा विषय इथे घ्यावा. आपण मत मांडल्याप्रमाणे या ठिकाणी तिन्ही विषय आलेले आहेत. परंतु, या ठिकाणी त्या विषयाचे गोषवारे नाहीत. आपण या विषयांचे गोषवारे घेऊन पुढे विषय आणावा. असे मी प्रशासन आणि मा. सभापती महोदयांना सुचीत करतो.

**एस. ए. खान :-**

मा. अध्यक्ष साहेब, त्याच्यामध्ये अडचण नाही. आपला या विषयाचा गोषवारा होईल.

**मोहन पाटील :-**

स्थायी समितीचा गोषवारा तुमच्याकडे पाहिजे.

**मिलन पाटील :-**

टाऊन प्लानिंगच्या अधिका-यांना गोषवारा का दिला नाही? ते विचारा.

**एस. ए. खान :-**

त्याच्यामध्ये अडचण आहे.

**मोहन पाटील :-**

तुम्हाला त्याच्यामध्ये काय अडचण आहे? आपल्याकडे या ठिकाणी गोषवारे नसल्यामुळे, बजेटमध्ये काय तरतुद आहे? हे महिती नसल्याने आपण हे विषय नंतर घेऊ आणि आपण विचारणा करु. आपण हे तिन्ही विषय पुढच्या वेळेला घेऊया.

**एस. ए. खान :-**

पुढची सभा ३१ तारखेला लावली असेल तर तेव्हा हे सगळे विषय घ्या.

**मा. सभापती :-**

या विषयाची माहिती श्री. अशोककुमार रणखांब, उपायुक्त (मु.) यांनी माहिती द्यावी.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

या ठिकाणी उपस्थित असेलेले स्थायी समितीचे सन्मा. सदस्य, आज या ठिकाणी स्थायी समितीच्या चर्चेला जो प्रश्न येत आहे. हा प्रश्न प्रभाग समिती व स्थायी समितीच्या कामकाजाविषयी आहे. सर्वात पहिली महत्वाची गोष्ट म्हणजे महानगरपालिकेच्या कायद्यानुसार अफिक्स ॲथोरिटी म्हणून स्थायी समिती म्हणजे महत्वाचे आणि अंतिम असे महानगरपालिकेचे प्राधीकरण आहे. ते प्राधीकरण म्हणून स्थायी समिती काम करते. या ठिकाणी प्रभाग समितीचे कामकाज करताना त्या कामकाजामध्ये वॉर्ड ऑफिसरने लक्ष देणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या कायद्यामध्ये प्रभाग समितीच्या कामकाजाची कार्यकक्षा ठरविलेली आहे. तुम्ही शिफारस करता ही शहराच्या विकासासाठी एक चांगली गोष्ट आहे. परंतु, एखादी गोष्ट ठरविताना त्या प्रभाग समितीचा वॉर्ड ऑफिसर, त्या प्रभाग समितीचा सचिव म्हणून काम करीत असतो. त्यामुळे आपल्या सभेसमोर येणाऱ्या विषयाबद्दल सांगायचे तर प्रभाग समित्या महानगरपालिकेपासून स्वतंत्र नाहीत. त्या महानगरपालिकेचाच एक भाग आहेत. प्रभाग समितीसमोर जो विषय चर्चेला येतो, तो विषय यापूर्वी स्थायी समितीसमोर किंवा महासभेसमोर चर्चेला गेलेला आहे की नाही याची आपण खातरजमा करुन घेतली तर आज विषयाचे जे ड्युप्लिकेशन होत आहे ते होणार नाही. तुमचे ठराव स्थायी समितीकडे शिफारस म्हणून येतील. ते परत डबल येणार नाहीत. ह्या ठरावावर महासभा किंवा स्थायी समितीने निर्णय घेतलेला आहे.. तो परत परत न होता कामाचा व्याप कमी हाईल आणि स्थायी समितीला त्या ठिकाणी निर्णय घेणे शक्य होईल. हा एक भाग झाला. दुसरा भाग सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेबांनी सांगितला की आता स्थायी समितीसमोर जे विषय आलेले आहेत, त्याच्या सोबत महापालिकेचा गोषवारा असणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचे कारण असे आहे की, हा विषय घेतल्यानंतर त्या विषयासाठी आवश्यक असलेली आर्थिक तरतुद आणि आपली काम करण्याची जी पध्दत आहे, आपल्याला त्याच्यामध्येच कुठे काम करणार आहोत ती तरतुद पाहिजे. ह्याच्यापूर्वी स्थायी समितीने काही निर्णय घेतलेले आहेतकी नाहीत याचा संपूर्ण विचार करुन आपल्याला हा गोषवारा देणे आवश्यक आहे. स्थायी समितीच्या सन्मा. सदस्यांना गोषवारा दिल्यानंतर त्याच्यावर निर्णय घेणे योग्य होईल. त्यामुळे जर गोषवाऱ्यासहित विषय आला तर सन्मा. सदस्य मोहन पाटील यांच्या म्हणण्याप्रमाणे तो विषय घेणे अधीक योग्य होईल. मी या गोष्टीशी १०० टक्के सहमत आहे. त्यामुळे त्यांनी जो हा प्रस्ताव मांडलेला आहे, त्याबाबत मा. सभापतीसाहेबांनी तसे निर्देश दिलेले आहे.

**मिलन पाटील :-**

गोषवारा देण्याची जबाबदारी कोणाची आहे.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

गोषवारा देण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे.

**मिलन पाटील :-**

गोषवारा का दिला नाही?

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

तुम्ही हा विषय परस्पर घेतलेला आहे. प्रशासन गोषवाऱ्यासहित विषय घेते.

**मिलन पाटील :-**

प्रभाग समितीने हा विषय सचिवांकडे दिलेला होता. मग सचिवांनी हा विषय परत पाठवायला पाहिजे होता. त्यांनी हा विषय तुमच्याकडे डायरेक्ट कसा पाठविला?

**एस. ए. खान :-**

हा विषय सचिवांकडे दिलेला होता. आमचा वेळ वाया गेलेला आहे.

**मोहन पाटील :-**

या ठिकाणी सन्मा. सदस्यांच्या तीव्र भावना आहेत. आपल्याकडे गोषवारा नाही. आपण हा विषय नंतर घेऊया. मी सर्व सन्मा. सदस्यांना सांगु ईच्छितो की दुसरा असा विषय आहे की, आता आपल्याकडे चार समित्या होणार आहेत. त्याच्यामध्ये आरोग्य समिती, झोपडपट्टी निर्मुलन समिती, शिक्षण समिती या आहेत. प्रभाग समिती त्या प्रभागापुरते काम करेल परंतु या समित्या सर्व मिरा भाईंदर शहरासाठी काम करणार आहेत. या ठिकाणी त्यांचे प्रस्ताव येणार आहेत. आपल्या समितीचे सिस्टिमने काम झाले पाहिजे. यासाठी आपल्या सर्वांचे सहकार्य लाभले पाहिजे.

**एस. ए. खान :-**

आपण चार समित्या स्थापन करणार आहोत. त्यांचा गोषवारा येणार नाही. म्हणून असे करायचे आहे का? परंतु, दुसऱ्या समितीचा गोषवारा येईल. त्या समित्यावाल्यांनी गोषवारा दिलेला नाही. म्हणून तुमचे प्रस्ताव द्या असे आम्ही त्यांना सांगायला पाहिजे का?

**मा. सभापती :-**

चार विभागाचे प्रस्ताव आलेले आहेत.

**एस. ए. खान :-**

चार विभागाचे प्रस्ताव आलेले नाहीत. फक्त प्रभाग क्र.४ चा प्रस्ताव आलेला आहे. दुसऱ्या समितीने प्रस्ताव पाठविलेले नाहीत. फक्त प्रभाग समिती क्र. ४ चे प्रस्ताव आलेले आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

आमच्या प्रभाग समितीच्या अध्यक्षांनी पाठवलेला प्रस्ताव का घेतला नाही?

**एस. ए. खान :-**

सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील, तुम्ही बोलता ते बरोबर आहे. परंतु, अध्यक्षांनी कळविले पाहिजे.

**मिलन पाटील :-**

टेंडरमध्ये गोषवारा बरोबर येतो.

**दिपक खांबित :-**

आमच्याकडे पन्नास ठराव आलेले आहेत. आम्ही त्याच्यापैकी काही ठराव स्थायी समितीला पाठवतो.

**मोहन पाटील :-**

तुमच्याकडे पन्नास ठराव आलेले आहेत ते आम्हाला मान्य आहे. आम्ही तुम्हाला रु. २ कोटी दिलेले आहेत. अजुनपर्यंत ते रु. २ कोटी तुमच्या ताब्यात आलेले नाहीत.

(प्रकरण क्र. १२८, १२९ व १३० बाबत सर्व सन्मा. सदस्यांनी सविस्तर चर्चा करुन प्रशासनामार्फत योग्य त्या गोषवाऱ्यासह पुढील सभेत विषय घेण्यांचे ठरविण्यांत आले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १३१ चे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतो की, आपण आपल्या मिरा भाईंदरमधील प्रत्येक गोष्टीसाठी तांत्रिक सल्लागार मागवतो. ते तज्ञ असायला पाहिजेत. याबद्दल सन्मा. सदस्यंनी कधीही सुचना केलेल्या नाहीत आणि सर्व सन्मा. सदस्यांनी मा. सभापती महोदयांना प्रत्येक वेळेला सहकार्य केलेले आहे. परंतु, आज मिरा भाईंदर महानगरपालिका झाल्यानंतर आपल्याकडे सिटी इंजिनियरची एक पोस्ट आहे. आपण मागच्या वेळेला बारा इंजिनियर मंजूर करुन घेतले. शिवाय आपल्याकडे जुने इंजिनियर आहेत आणि आपण या इंजिनियरना पूर्णपणे पगार देतो. सिटी इंजिनियरच्या अखत्यारीत सगळी कामे व्हायला पाहिजे. सिटी इंजिनियर ही संपूर्णपणे टेक्निशियन पोस्ट आहे. आपण आपल्या अधिकाऱ्यांनासुध्दा पगार देतो. पगार देणे हे त्यांचे काम आहे. आपण त्यांना त्यांच्या कामाचा पगार देतो. आपण त्याच्या व्यतिरिक्त टेक्निशियन मागवतो. जर हे टेक्निशियन नसतील तर आपण हे जे अधिकारी ठेवलेले आहेत ते अधिकारी असले पाहिजेत. आपल्याला याचा खर्च रु. २ कोटीच्यावर येऊ शकतो. जर रु. २ कोटीच्यावर खर्च या तांत्रिक सल्लागाराला येत असेल तर आपले तांत्रिक किंवा टेक्निशियन बांधकाम विभागामध्ये बसलेले आहेत, ते काय करतील? आपण त्यांना कामे दिली पाहिजे. आपले जे रु. २ कोटी वाचले तर आपण त्यांचा पगार भरायला पाहिजे. आपण अशा पध्दतीने जे तांत्रिक सल्लागार मागवतो ते न मागवता आपल्या बांधकाम विभागाचे अधिकारी सक्षम आहेत. आपण त्यांच्याकडून काम करुन घेतले पाहिजे. मी या ठिकाणी असा ठराव मांडतो की असे तांत्रिक सल्लागार न मागवता आपण आपल्या खात्यामार्फत ही कामे करुन घ्यावीत.

**रतन पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे. तसेच, या ठरावाला सर्वांचे अनुमोदन नोंद करुन घ्या.

**मिलन पाटील :-**

आपले जे सिटी इंजिनियर आहेत, ते जवळ जवळ पाच आकडी पगार घेतात. परंतु, ते सक्षम आहेत का? जर ते सक्षम नसतील तर दुसरे सिटी इंजिनियर नेमा आणि या सिटी इंजिनियरना पाठवून द्या. सिटी इंजिनियर सक्षम नाहीत.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

मी याबाबत असा खुलासा करतो की, आपण प्रत्येक वेळेला अधिकाऱ्याच्या कामाचा किंवा पगाराचा संबंध लावता हे संविधानिक होणार नाही. तुम्ही योग्य पध्दतीने बोलत नाहीत. अधिकारी किती पगार घेतो याच्याशी आपला संबंध नाही. अधिकाऱ्यांनी काय काम केले पाहिजे ते तुम्ही सांगा. परंतु, हा अधिकारी एवढा पगार घेतो, तो अधिकारी तेवढा पगार घेतो हे बोलणे योग्य नाही.

**मिलन पाटील :-**

आम्हाला हे विचारण्याचा अधिकार आहे. तो माणूस एवढ्या आकड्याचा पगार घेतो आणि तो माणूस सक्षम नसेल तर काय फायदा आहे? हा आमचा अधिकार आहे. तुम्ही आमच्या अधिकाराबाबत बोलू नका.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

कोण किती पगार घेतो हे बोलणे उचित नाही.

**मिलन पाटील :-**

तो अधिकारी पगार घेत नाही. आम्ही त्या अधिका-याला पगार देतो. आम्ही त्या अधिका-याला पगार दिल्यानंतर त्या अधिका-याने आमच्या महानगरपालिकेच्या हिताचे काम केले पाहिजे. जर ते अधिकारी हिताचे काम करत नसतील तर त्या अधिका-यांना आमच्या पगाराची आवशक्ता नाही. याचा अर्थ ते अधिकारी सक्षम नाहीत.

**रतन पाटील :-**

आज तांत्रिक सल्लागार नेमून मिरा भाईंदरवर करोडो रुपयाची उधळन लावलेली आहे. सामान्य नागरिकांना कर रुपाने पैसे द्यावे लागतात.

**मिलन पाटील :-**

तुम्ही आमच्या अधिकारावर गदा आणू शकत नाही. आम्ही आरोप करु शकतो. तो आमचा अधिकार आहे. तुम्ही तुमची तक्रार प्रशासनाच्या बाजूने मांडा. तुम्ही आमचा अधिकार हिरावून घेऊ शकत नाही.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मु.) सा०.) :-**

अधिकार हिरावून घेण्याचा प्रश्न येत नाही.

**मिलन पाटील :-**

तुम्ही पगार घेतो असे बोलू शकत नाही. आम्ही तुम्हाला पगार देतो असे आमचे म्हणने आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, ठराव झालेला आहे.

**प्रभात पाटील :-**

मी मागच्या वेळेला अशीच बोलली होती की, किती जणांना मुदतवाढ द्यायची आहे. प्रत्येकाला मुदतवाढ द्या, प्रत्येकाला तांत्रिक सल्लागार नेमा. इथे फक्त बोलून फायदा नाही. बाहेर पेपरवाले बातम्या देत आहेत. स्थायी समिती ही गठीत समिती किंवा गुपित समिती आहे. मग तिचा काय फायदा आहे. कारण स्थायी समितीचे सर्व काही बाहेर पडत आहे.

**मा. सभापती :-**

हा ठराव नामंजूर झाल्यामुळे पुढील विषय घेण्यांत यावा.

**रतन पाटील :-**

सार्वजनिक बांधकाम विभागाने या कामावर लक्ष ठेवावे.

**प्रभात पाटील :-**

हा विषय फक्त नामंजूर करुन चालणार नाही. तर संबंधित खात्याने हे कामकाज पुढे चालवावे.

**मिलन पाटील :-**

संबंधित खात्याची ती जबाबदारी आहे.

**गजानन भोईर :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्वाजनिक बांधकाम विभागाचे हे काम आहे.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाने या कामावर लक्ष ठेवावे असे रुलिंग द्या.

**मिलन पाटील :-**

मुख्यत्वे करुन सिटी इंजिनियरने लक्ष द्यावे.

**मा. सभापती :-**

परंतु, याचा अर्थ सार्वजनिक बांधकाम विभागाने लक्ष दयावे असाच होतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपण ठराव नामंजूर केलेला असल्यामुळे हा विषय तीन महिन्यानंतर पुन्हा येऊ शकतो.

**रतन पाटील :-**

साहेब, अर्थ न काढता तुम्ही तसे रुलिंग द्या. नाहीतर हा विषय पुन्हा येईल.

**मिलन पाटील :-**

विषय नामंजूर होण्याचा प्रश्न येत नाही. तुम्ही हे सिटी इंजिनियरचे काम असल्याचे तुम्ही या विषयावर रुलिंग द्या.

**गजानन भोईर :-**

मिरा भाईंदरच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे हे काम आहे असे तुम्ही रुलिंग द्या.

**रतन पाटील :-**

आपल्या आखत्यारित आणि त्यांच्या देखरेखीमध्ये हे काम झाले पाहिजे.

**मा. सभापती :-**

या विषयाशी संबंधित असलेल्या इंजिनियरची जबाबदारी राहणार आहे आणि त्यांनी हे काम पार पाडायचे आहे.

**रतन पाटील :-**

काम सार्वजनिक बांधकाम विभागाचे आहे.

**प्रकरण क्र. १३१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या विकास आराखड्यातील रस्त्याच्या कामांवर देखरेख व नियंत्रण ठेवण्याकरीता तांत्रिक सल्लागाराची नेमणुक करणे बाबत विचार विनिमय करुन मान्यता देणे.

**ठराव क्र. १३५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत करावयाच्या विविध विकास आराखड्यातील रस्त्यांच्या कामांना मा. महासभा दि. ०५/०६/२००४, ठराव क्र. ०७ (एकूण १ ते ११ कामे) अन्वये मान्यता प्राप्त आहे. सदर कामी निविदा मागविण्यास मा. स्थायी समिती सभा दि. २९/०१/२००५ ठराव क्र. १३६ अन्वये मान्यता प्राप्त आहे.

सदर कामाची अंदाजपत्रके सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तयार करण्यात आलेली आहेत सदर कामाच्या निविदा मागवावयाच्या आहेत. सदर कामांच्या निविदा मागविल्यावर सदर कामांवर देखरेख व नियंत्रण ठेवणे, कामांची मोजमापे घेणे या कामाकरीता पुरेसा तांत्रिक कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्याने तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करण्याबाबत मा. आयुक्त यांनी सूचना दिल्या अहेत. त्यानुसार सदर प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. सदर तांत्रिक सल्लागार खर्चाकरिता अर्थसंकल्पात तरतूद उपलब्ध आहे. तरी तांत्रिक सल्लागार नेमणेस स्पर्धात्मक निविदा मागविण्यास शिफारस आहे. मा. महासभा दि. ३/०८/२००४ ठराव क्र. ३५ अन्वये सदर रस्त्याच्या कामाबाबत सर्व कार्यवाही करण्यास मान्यता प्राप्त आहे. परंतु महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे शहर अभियंता, उपअभियंता व भरपूर कनिष्ठ अभियंता उपलब्ध असल्याने सदर डी. पी. रोड कामावर देखरेख व नियंत्रण विभागामार्फत करण्यांत यावी, तांत्रिक सल्लागार नेमण्यांत येऊ नये.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १३२ चे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. खांबित साहेब, आपण किती कत्तलखाने बांधणार आहोत.

**जयंत पाटील :-**

आरक्षण क्र. २९ कुठे आले?

**दिपक खांबित :-**

आरक्षण क्र. २९ हे उत्तनला आले.

**गजानन भोईर :-**

आरोग्याविषयी म्हणजे कत्तलखाना वगैरेबाबत कोण माहिती देईल?

**जयंत पाटील :-**

हे आरक्षण किती जागेमध्ये आहे?

**मिलन पाटील :-**

तिकडे काय आहे? ते नगररचना विभागाला विचारा.

**जयंत पाटील :-**

त्या ठिकाणी आपले डंपींग ग्राऊन्ड होत नाही.

**गजानन भोईर :-**

याबाबतची माहिती मिळविण्यासाठी आरोग्य खात्याला बोलवा.

**अशोककुमार रणखांब (मा. उपायुक्त (मु.) साो.) :-**

मा. सभापती साहेब, आरक्षण क्र. २९ हे उत्तनला आहे आणि दुसरे आरक्षण क्र. ७६ हे भाईंदर (प.) ला आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही एकच आरक्षण क्र. २९ दिलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

हा आरक्षण क्र.२९ दिलेले आहे. परंतु, ती जागा मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये किंवा हद्दीमध्ये असे दिलेले आहे. हा आरक्षण क्र. कुठे आला? गोडदेव, खारीगाव किंवा दुसरीकडे कुठे हा आरक्षण नंबर आलेला आहे.

**जयंत पाटील :-**

ह्या आरक्षण क्रमांकाचे लोकेशन कुठे आहे?

**गजानन भोईर :-**

हा मौजे आहे.

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

ते टाऊन प्लानिंग डिपार्टमेन्टला विचारावे लागेल.

**रतन पाटील :-**

ह्या आरक्षण क्र. २९ चे लोकेशन २८/२४८ मध्ये आहे.

**जयंत पाटील :-**

ती जागा किती आहे?

**गजानन भोईर :-**

मौजे उत्तनचे संपूर्ण क्षेत्रफळ किती आहे?

**एस. ए. खान :-**

श्री. पानपट्टेसाहेब, याचे एग्झॅक्ट लोकेशन सांगा.

**प्रभात पाटील :-**

दोन्हीचे एकच सर्व्हे नंबर होते.

**एस. ए. खान :-**

या ठिकाणी एकच सर्व्हे नंबर दिलेला आहे.

**रतन पाटील :-**

आपण प्रथम तिकडचा सर्व्हे नंबर घेतो.

**गजानन भोईर :-**

आपल्याला कोबडी कापण्यासाठी की बकरे कापण्यासाठी कत्तलखाना पाहिजे की अजून कशासाठी पाहिजे.

**सुर्यकांत भोईर :-**

मिरा भाईंदरमध्ये कुठल्याही एका ठिकाणी कत्तलखाना पाहिजे.

**रतन पाटील :-**

साहेब, मला या ठिकाणी एवढीच माहिती द्या की, आपण कत्तलखाना चालू करतो म्हणजे खाटिकखाने बंद होणार आहे का?

**मा. सभापती :-**

भाईंदरला कत्तलखान्यासाठी जागा कुठे आहे?

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

शेळ्या आणि मेंढ्यासाठी छोटे-छोटे कत्तलखाने करण्याऐवजी मोठा कत्तलखाना उत्तनला होणार आहे.

**रतन पाटील :-**

उत्तनला मोठा कत्तलखाना होणार म्हणजे तिथे कोणाची कत्तल होणार आहे?

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण तिथे बैल कापणार आहोत.

**सुर्यकांत भोईर :-**

परंतु, बैल कापायची जरुरी आहे का?

**मोहन पाटील :-**

आपण कत्तलखान्याचे रिझर्वेशन इतर कुठल्याही रिझर्वेशनमध्ये बदली करु शकतो. आपल्याकडे अशी प्रोव्हिजन आहे.

**जयंत पाटील :-**

परंतु, आपल्याला या ठिकाणी पर्टिक्युलर जागा दिलेली आहे. आरक्षण क्र.२९ कुठे आहे? आणि ती किती जागा आहे? आपल्याला याच विषयावर बोलायचे आहे.

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आरक्षण क्र.२९ ची जागा ०.५५ हेक्टर आहे. म्हणजेच ती जागा हेक्टर आहे.

**जयंत पाटील :-**

या गोष्टीबाबत तेथील लोक मान्यता देतील का?

**मिलन पाटील :-**

ती जागा एग्झॅक्ट कुठे आहे ते सांगा.

**गजानन भोईर :-**

अडीच हेक्टर म्हणजे ती जागा पंधरा एकर आहे का?

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण याच्यासाठी सल्लागार नेमणार आहोत. सल्लागार नेमल्यानंतर सविस्तर माहिती देण्यांत येईल.

**सुर्यकांत भोईर :-**

कत्तलखाने नेमायला सल्लागाराची काय आवशक्ता आहे? साडे बारा एकरचा कत्तलखाना कशाला पाहिजे?

**रतन पाटील :-**

कत्तलखान्यामध्ये शेळ्या, मेंढ्या आणि कांबड्या कापल्या तर चालतील.

**गजानन भोईर :-**

कत्तलखाना कशासाठी पाहिजे. याचा गोषवाऱ्यामध्ये काहीही उल्लेख नाही. मग आपण सल्लागार कशाला नेमायचा?

**सुर्यकांत भोईर :-**

मिरा भाईंदरमध्ये कत्तलखान्याची काय गरज आहे?

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य एस. ए. खानसाहब, आपको कत्तलखाना चाहिए क्या बोलो।

**एस. ए. खान :-**

मुझे कत्तलखाना चाहिए।

**गजानन भोईर :-**

एक बोलतो बकरे कापायचे, एक बोलतो शेळ्या कापायच्या म्हणजे प्रशासनाला याबाबत माहिती नाही असे वाटते.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य एस. ए. खानको बकरा काटने का है।

**एस. ए. खान :-**

वह जगह बकरा कापने के लिए चाहिए। क्योकी पुरे शहरमे गंदगी नही फैलनी चाहिए। मतलब पुरे शहरमे लोग इधर उधर बकरे कॉटते है। उसकी वजह अगर लोग एक जगह पर बकरा कॉटेंगे तो अच्छा होगा।

**रतन पाटील :-**

साहेब, आम्हाला एकच सांगा की, आपण आता कत्तलखान्यासाठी जागा निवडलेली आहे. तुम्ही तिथे काय कापणार आहात? त्या ठिकाणी फक्त बैलच कापणार आहात की शेळ्या, मेंढ्यासुध्दा कापणार आहात.

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

त्या कत्तलखान्यामध्ये फक्त मोठी जनावरे व बैल कापणार आहोत.

**रतन पाटील :-**

मोठी जनावरे कुठली?

**जयंत पाटील :-**

तुम्ही साहेबांना मोठ्या जनावरांची नावे वाचून दाखवा.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, तुम्ही साडे-बारा एकर जागेमध्ये काय करणार आहात? एवढा मोठा कत्तलखाना कशासाठी आहे.

**मा. सभापती :-**

आपल्याला त्याच्यावर अधिकारी नेमायचा आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

अधिकारी कशाला हवा?

**मा. सभापती :-**

तो कत्तलखाना कसा करायला पाहिजे, आपल्याला ते सर्व कळण्यासाठी त्याच्यावर अधिकारी नेमायचा आहे.

**जयंत पाटील :-**

आता मा. उपायुक्तांनी सांगितले की, आम्ही कत्तलखान्यात बैल कापणार आहोत. परंतु, या मिरा भाईंदरमध्ये बैल खाणारे किती लोक आहेत? याचा तुम्ही सर्व्हे केलेला आहे का?

**एस्. एस्. पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

हा विषय माझ्याकडून आलेला नाही. मी तुम्हाला तुम्ही विचारलेली माहिती सांगितली. ह्या विषयाबाबतचा धोरणात्मक निर्णय तुम्ही घ्यायचा आहे.

**दिपक खांबित :-**

आपल्याला आपल्या शहराकरीता कत्तलखाने बनवायचे आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

छोटे-छोटे कत्तलखाने आहेत, तेवढे पुरेसे आहेत. अजून कत्तलखाने नको.

**दिपक खांबित :-**

कत्तलखाने बांधण्याकरीता मा. महासभा दि. ०३/८/२००४ मधील ठराव क्र. ३५ अन्वये प्राधान्याने ठरविलेले आहेत. आपल्याला त्याच्यातील आरक्षण विकसित करायचे आहे. आपण या कत्तलखान्यावर कन्सलटन्ट नेमणार आहोत. आपल्याला तो कन्सलटन्ट सगळे प्लॅन एस्टिमेट करुन देणार आहे. त्याच्याकरीता सेन्ट्रल गव्हर्नमेंन्ट आणि स्टेट गव्हर्नमेन्टकडे सगळे पेन्डीग असते. त्यांच्याकडून १०० टक्के अनुदान मिळते. त्याच्यामधून हे काम करायचे आहे. शिवाय, आपण एस्टिमेट महासभेत मंजूरीसाठी ठेवणार आहोत. कन्सलटन्ट कत्तलखान्याबाबत जो अहवाल तयार करतो, तो अहवाल महासभेमध्ये पुन्हा मंजूरीसाठी येईलच.

**मा. सभापती :-**

तो अहवाल पुन्हा महासभेत येऊ दे.

**सुर्यकांत भोईर :-**

महापालिकेमध्ये एवढे इंजिनियर बसलेले आहेत. त्यांना कोणाला तरी कामाला लावा.

(सभागृहात गोंधळ)

**मा. सभापती :-**

या ठिकाणी कत्तलखान्याचा विषय आला म्हणजे कत्तलखाना तयार झाला असा अर्थ होत नाही. आपल्याला त्याच्यावर तांत्रिक सल्लागार नेमायचा आहे. त्याच्यानंतर हा विषय पुन्हा येईल.

**रतन पाटील :-**

हा विषय आलेला नाही हे बरोबर आहे. परंतु, आपण या ठिकाणी या विषयाची मंजूरी घेत आहोत.

**एस. ए. खान :-**

आपल्याला कत्तलखाना एक ठिकाणी तयार करायचा आहे आणि आपण त्यासाठी विषय आणलेला आहे. आपण कत्तलखाना एक ठिकाणी सायीस्कर वाटले तर करु नाहीतर आपण कत्तलखाना एक ठिकाणी नको करु या. आपण त्यासाठी सल्लागार नेमू.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्यांनी शांत रहावे ही माझी विनंती आहे. आता प्रश्न आहे की तांत्रिक सल्लागार नेमल्यानंतर आपण त्या ठिकाणचे रिझर्वेशन कुठे ठेवणार आहोत? आपल्याकडे रिझर्वेशन चेंज करण्याची प्रोव्हिजन आहे. आपल्याकडे लहान लहान खाटीक किंवा बैल वगैरे आहेत. जर त्याच्यासाठी कत्तलखाना तयार झाला तर आपल्याला ही प्रोव्हिजन करता येईल. कारण आतमध्ये जे संपूर्ण मटण म्हणजे बकरे वगैरे कापतात, ती लोक ते बकरे वगैरे सगळे खुलेआम कापतात. आपण जर याबाबतीमध्ये तांत्रिक सल्लागार नेमला आणि जर आपल्याला त्या तांत्रिक सल्लागाराने गाईडलाईन्स दिल्या तर आपण त्या गाईडलाईन्सप्रमाणे गोषवारा दिल्यानंतर हा विषय विषयपटलावर येईल. आपण तो विषय मंजूर करावा की नामंजूर करावा किंवा त्याबाबत सुचना द्याव्यात की देऊ नये हा अधिकार संपूर्णपणे आपल्या सभागृहाचा अधिकार आहे. म्हणून आपल्याकडे ह्या विषयाबाबत रिझर्वेशन आहे. रिझर्वेशन बदली करता येते. हा एक वेबळा विषय झाला. आपण जर हे कत्तलखाने संपूर्णपणे विकसित करण्याचा प्रयत्न केला तर आपल्याला त्याच्यासाठी गव्हर्नमेन्टची संपूर्णपणे संमती आहे. आपल्याकडे तो विषयसुध्दा आहे. या शहरामध्ये जे बकरे कापले जातात, आपल्याकडे त्याच्यासाठी कुठेही जागा नाही. आपल्याला त्या पध्दतीच्या जागेची प्रोव्हिजन त्या ठिकाणी करता येईल. यासाठी आपल्याला तांत्रिक सल्लागार नेमणे अत्यंत आवश्यक आहे. आपण तांत्रिक सल्लागार नेमल्यानंतर आपल्याला १०० टक्के माहिती पडेल. आपले आताचे इंजिनियर किंवा जे.ई. वगैरे काम करु शकत नाहीत. म्हणून आपल्याला त्याच्यासाठी तांत्रिक सल्लागार नेमणे आवश्यक आहे. बकरे कापणे हा एक वेगळा विषय आहे. सन्मा. सदस्य रतन पाटील, आपण मांसाहार करीत नसलो तरी आपला समाज पूर्णपणे मांसाहारी आहे. या शहरामध्ये मांसाहारी आहेत. आज आपण मांसाहार करीत नसाल म्हणून सगळे लोक मांसाहार करीत नाहीत असा अर्थ होऊ शकत नाही. आपल्या बाजूला डॉ. रमेश जैनसाहेब बसलेले आहेत, ते मांसाहार करीत नाहीत जरीसुध्दा ते या विषयावर बोलू इच्छितात. मी सर्व सन्मा. सदस्यांना विनंती करतो की, कत्तलखान्याचे रिझर्वेशन विकसित करण्यासाठी सल्लागाराची आवशक्ता आहे. आपल्याला सल्लागार ज्या काही सुचना देतील, आपण त्या सुचनांप्रमाणे दुरुस्ती करुन घेऊ. आपल्याला तो कत्तलखाना नको असेल तर आपण तो कत्तलखाना काढू शकतो. आपल्याला महासभेने जी प्राधान्य यादीचा उल्लेख मगाशी केलेला आहे, त्याच्यामध्ये ड्रामा थिएटर, गार्डन्स आहेत, हॉस्पीटल आहेत. आपल्या महासभेने कत्तलखाना प्राधान्याने मंजूर केलेला आहे. महासभेने कत्तलखाना मंजूर केल्याप्रमाणे या ठिकाणी विषय आलेला आहे. आपण तांत्रिक सल्लागार नेमल्यानंतर त्या तांत्रिक सल्लागाराने दिलेल्या सल्ल्याप्रमाणे आपल्याला याबाबत पूर्णपणे संधी मिळणार आहे. कारण पंधर एकर जागा द्यायची की नाही हा आपला विषय आहे. या कत्तलखान्यामध्ये गुरे, ढोरे, बकरे कापायचे आहेत. आपण ते कापू शकतो की नाही हा विषयसुध्दा येणार आहे. त्यांनी आपल्याला योग्य निर्णय

योग्य ठिकाणी दिला आणि सर्व काही परिपूर्ण झाले तर आपल्याला त्याची १०० टक्के ग्रॅन्ड मिळणार आहे. आपल्याला महानगरपालिकेचा कोणताही खर्च न करता त्याचे रिझर्वेशन करता येईल.

**मिलन पाटील :-**

आपल्याला सेन्ट्रल गव्हर्नमेन्टचे पैसे मिळतील?

**मोहन पाटील :-**

आपण सल्लागार नेमल्यानंतर आपल्याला पुढच्या गोष्टी करता येतील.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्याला फक्त एक तांत्रिक सल्लागार नेमायचा आहे. आपल्याला पुढे काय करायचे आहे हा नंतरचा विषय आहे. आपल्याकडे जे बारा इजिनियर आहेत ते हे काम करु शकत नाहीत का?

**मिलन पाटील :-**

ते सिटी इंजिनियर आहेत. म्हणजेच सिटी इंजिनियर हे पाईपलाईनचे इंजिनियर आहेत. त्यांना आर.सी.सी. येत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपले बारा इंजिनियर सिव्हील इंजिनियर नाहीत का?

**गजानन भोईर :-**

बैल कापायचे, कोंबड्या कापायच्या की, बैल कापायचे याचा ते सल्ला देतील.

**मिलन पाटील :-**

मा. सभापतीसाहेबांनी गोषवारा पाठविलेला असल्यामुळे त्यांना बोलू दे.

**मा. सभापती :-**

आपल्याला फक्त तांत्रिक सल्लागार नेमायचा आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

त्या तांत्रिक सल्लागाराचा पगार किती असेल वगैरे ह्याच्यामध्ये लिहा.

**मोहन पाटील :-**

आपण सल्लागार नेमल्यानंतर त्यांचा पगार ठरवायचा आहे.

**मा. सभापती :-**

आता खाटिक हे रस्त्याला किंवा कुठेही आपले दुकान लावतात. जर आपण एकत्र किंवा एका ठिकाणी व्यवस्थित करुन दिले तर सुधारणा होईल.

**एस. ए. खान :-**

सुधारणा होईल आणि स्वच्छतासुध्दा होईल.

**रतन पाटील :-**

आम्ही तेच बोलतो. तुम्हाला देता येत असे तर द्या असे आमचे म्हणने आहे.

**मोहन पाटील :-**

आता या ठिकाणी अधिकारी, सिटी इंजिनिअर आणि डॉ. बावस्कर या दोघांचे म्हणणे ऐका. आपण त्याच्यानंतर याबाबतच्या सुचना मांडू.

**एस. ए. खान :-**

आता एकत्रित ठिकाणी आणि व्यवस्थितरित्या मोकळ्या हवेवर कत्तलखाना झाला तर आपल्याला ही जनावरे व्यवस्थित कापता येतील. म्हणजे आपल्याला ही जनावरे एकत्रित ठिकाणी कापता येतील.

**प्रेमनाथ पाटील :-**

आमचा कत्तलखान्याबाबत विरोध नाही. आमचा विरोध तांत्रिक सल्लागार नेमण्याबाबत आहे.

**एस. ए. खान :-**

संपूर्ण शहरामध्ये जी घाण होते, ती स्वच्छ करावी लागेल.

**शरदचंद्र वैरागडे :-**

हे जे काम आहे, आपल्याला याच्याबाबत फक्त कन्सलटन्ट नेमायचा आहे. हे काम फक्त सिव्हिल वर्कसाठी नाही. आपले म्हणने फक्त सिटी इंजिनियर पाईपलाईनच्या वर्कसाठी असते तर मी केले असते. त्याच्यासाठी सल्लागार नेमला नसता. आपण ह्या वर्कसाठी पूर्णपणे गोषवारा वाचला तर मी याच्यामध्ये संपूर्णपणे लिहलेले आहे की ह्याच्यामध्ये सिव्हिल ले आऊट, सिव्हिल स्ट्रक्चर, मेकेनिकल, इलेक्ट्रीकल, एबनॅल डिस्पोजल, कम्पोनन्ट आणि ड्रॉईंग प्लॅन, एबनॅल डिस्पोजल सिस्टीम म्हणजे तिथे बकरे कापल्यानंतर जे बाहेर पडते त्याचे ट्रीटमेन्ट आहे. हे पाईपलाईन इंजिनियरचे काम नाही. दुसरे म्हणजे इलेक्ट्रीकल आणि मेकेनिकल पार्ट ह्याच्यामध्ये जवळ जवळ १० ते १५ टक्के असते. तेसुध्दा सिव्हिलवाल्याचे काम नाही. आपल्याला ह्याच्यासाठी हे सर्व एकत्रित जाणणारा माणूस किंवा अशी एक एजन्सी जिथे या सगळ्या संस्था त्याच्यासाठी काम करतात. अशी एक संस्था नेमायची आहे. आपण त्याला कन्सलटन्ट बोलतो. आपण असा कन्सलटन्ट

नेमला तर आपल्याला तो कन्सलटन्ट कत्तलखाना कशाप्रकारे, कशा स्टेजेसमध्ये डेव्हलप करता येईल, तिथे किती एरिया लागेल, काय-काय करता येईल याचा पूर्ण रिपोर्ट देईल.

**जयंत पाटील :-**

असा प्रश्न आहे की, आपण जे डिपार्टमेन्ट ऑफ ॲनिमल हॅजबन्डरीज ॲन्ड डेरीज मागविलेल्या आहेत त्याच्यामध्ये कत्तलखान्याचा उल्लेख होत नाही. डिपार्टमेन्ट ऑफ ॲनिमल हॅजबन्डरीज वेगळा अर्थ होतो. ही वापरण्यासाठी नाही. आपल्याला ही संस्था हे काम नक्की करुन देणार आहे का? की त्यासंबंधी दुसरी संस्था आहे. डिपार्टमेन्ट ऑफ ॲनिमल हॅजबन्डरीज ॲन्ड डेरीज याचा काय अर्थ होतो.

**दिपक खांबित :-**

आपल्याला ह्याच्या गाईडलाईन्सप्रमाणे प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करायचा आहे.

**जयंत पाटील :-**

या ठिकाणी तुमची कुठेतरी गल्लत होत आहे.

**दिपक खांबित :-**

आपण कत्तलखान्याकरीता हे डिपार्टमेन्ट दिलेले आहे.

**जयंत पाटील :-**

श्री. दिपक खांबित, तुम्ही एक मिनिट थांबा. तुम्ही यांच्याशी पत्रव्यवहार केलेला आहे का?

**दिपक खांबित :-**

आमच्याकडे यांच्या गाईडलाईन्स आहेत. पत्रव्यवहार केलेला नाही.

**जयंत पाटील :-**

हे कत्तलखाने डेव्हलप करु शकतात का?

**मोहन पाटील :-**

त्या विषयाबाबत डॉ. बावस्कर साहेबांना बोलू दे. आपण ह्या विषयाची तयारी करुन ह्या विषयाबाबत बोलावे. आपल्याला जर या विषयाची माहिती मिळाली तर आपल्याला या विषयावर बोलता येईल.

**रतन पाटील :-**

आम्ही या विषयावर चर्चा करु.

**गजानन भोईर :-**

आपण या विषयाबाबत सांगा की, दिवसकार्य करायचे आहे की लग्न लावायचे आहे.

**डॉ. बावस्कर :-**

मा. सभापतीसाहेबांच्या परवानगीने बोलतो की, आपल्याकडे कत्तलखाने आहेत. त्याबद्दल मी तुम्हाला थोडीशी माहिती देतो की, जो आधुनिक प्रकारचा कत्तलखाना असतो. आपल्याकडे सध्या औरंगाबादला ब्रुक बॉन्डचा एक कत्तलखाना आहे आणि ब्रुक बॉन्डचा एक अतिशय चांगला कत्तलखाना भुवनेश्वरला आहे. एक कत्तलखाना लहान जनावरांसाठी आणि एक कत्तलखाना मोठ्या जनावरांसाठी असे वेगवेगळे असतात. आपल्याला लहान जनावरांच्या कत्तलखान्यासाठी सल्लागारांची गरज नसते. आपल्याला तो कत्तलखाना बांधकाम विभागामार्फत किंवा दुसऱ्या डिपार्टमेन्टची मदत घेऊन बांधता येतो. आपण आपल्या विभागात असे दोन किंवा तीनकत्तलखाने बांधु शकतो. परंतु, हा जो मोठ्या जनावरांचा जो कत्तलखाना असतोआणि आज जी घाण लहान जनावरांच्या आणि मोठ्या जनावरांच्या कापण्यामुळे त्याचे रक्त आणि त्याचे जे वेस्ट असते, त्याच्यामुळे त्याची दुर्गंधी मोठ्या प्रमाणात असते. केंद्र शासनाची गाईडलाईन आहे की, आधुनिक प्रकारचे आणि वेगवेगळ्या अशाप्रकारचे कत्तलखाने व्हायला पाहिजेत. मोठ्या जनावरांच्या कत्तलखान्याबाबत श्री. शरदचंद्र वैरागडे साहेबांनी आता माहिती दिलेली आहे. याच्यामध्ये पूर्णपणे ॲटोमॅटीक आणि मॅकेलाईज सिस्टीम असल्यामुळे या ठिकाणी माणसांचा सहसा वापर होत नाही. याच्यामध्ये दोन प्रकार असतात की एक डायरेक्ट मशिनमध्ये असते आणि एक हलाल असते. आपल्याकडे मोठ्या जनावरांसाठी जे हलाल लागते त्याच्यामुळे त्या ठिकाणी एक माणूस कापण्याची व्यवस्था करतो. परंतु, त्याच्यानंतरचे जे काम वरची कातडी काढण्यापासून ते आतडी काढणे किंवा त्याचे पार्ट वेगवेगळे करणे याच्यासाठी ती सिस्टीम पूर्णपणे मशिनवर अवलंबून असते किंवा मॅकेनाईज असते. त्या ठिकाणी माणसाचा संपर्क कुठेही येत नाही. त्यामुळे त्याची स्वच्छता राहते आणि एका चांगल्याप्रकारचे मांस त्या ठिकाणी तयार होते. याच्यामध्ये अशा प्रकारचा कत्तलखाना असला तर ज्या एक्सपोर्ट कंपन्या आहेत. ऑल कबीर ही एक भारतातील सर्वात मोठी एस्कस्पोर्ट कंपनी आहे. ते पूर्वी नवी मुंबईच्या विभागात कत्तलखाने चालवायचे. ऑल कबीर सारख्या कंपन्या किंवा या कंपन्यासुध्दा आपल्याकडे आपला मेन्टेनन्स किंवा प्रोजेक्टचा बराचसा खर्च ते उचलू शकतील. त्यांचा ठराविक कोटा असतो. त्यांना त्या कोट्यामधून फक्त ठराविक कापून द्यायचे असते. ते इकडून बंद गाडीतुन घेऊन जातात. आपल्याला ह्याच्यामध्ये दुसरे असे प्रोव्हिजन करता येते की, कत्तलखाना उभारताना आज मोठ्या जनावरांच्या मांस विक्रीची दुकाने वेगवेगळ्या विभागामध्ये विखुरलेली आहेत. नागरिकांच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी येतात की, अशी दुकाने आमच्या सोसायटीच्या बाजूला, आमच्या घराच्या बाजूला या ठिकाणी किंवा त्या ठिकाणी आहेत. जनरली महानगरपालिका जेव्हा कत्तलखाना उभारते तेव्हा महानगरपालिका त्या

दुकानांची त्याच ठिकाणी सोय करते. आणि त्याचे भाडे महिन्याला वसूल करते. आपल्याला ह्या लॉटरी सिस्टीमने त्या ठिकाणी अशी दुकाने काढून देता येतील आणि त्याच्यावर जास्त मेन्टेनन्स आकारले जाते. लहान जनावरांच्या कत्तलखान्यासाठी चांगली जागा उपलब्ध झाली तर बाकीचे सर्व कत्तलखाने आपल्याला अशाप्रकारे शिफ्ट करता येतील. ज्यांना मांस विकत घ्यायचे आहे अशी लोक त्या ठिकाणी जाऊ शकतील. आपण जर ही पध्दत सेन्ट्रलाईज केली तर उदाहरणार्थ जैन धर्मीय मांसाहार करीत नाहीत किंवा आता सोसायटीच्या ज्या तक्रारी येतील त्या सर्व तक्रारी याच्यामुळे दुर होऊ शकतील. हा जो आधुनिक प्रकारचा कत्तलखाना आहे, हा एक वेगळ्या प्रकरचा प्रकल्प आहे. याच्यामध्ये बरेचसे इक्विपमेन्ट असतात. मॅकेनाईजेशन आणि इलेक्ट्रीकल इक्विपमेन्ट असतात. हे संपूर्ण पुलिंग चैन व ॲटोमॅटीक सॉ ह्या सगळ्या गोष्टी त्याच्यामध्ये येतात. हा प्रकल्प पुर्णपणे अत्यंत चांगला आहे. त्याच्यापासून निघणाऱ्या वेस्टची ट्रीटमेन्ट कशी करायची आणि त्याचे डीस्पोजल असे करायचे त्याच्यामध्येसुध्दा त्याचा समावेश होतो. आपण त्याच्यापासून त्या ठिकाणी बायोगॅस निर्माण करु शकतो. त्या ठिकाणी काही प्रमाणात बायोगॅसपासून इलेक्ट्रीसीटी निर्माण करता येऊ शकते. मी तुम्हाला फक्त कत्तलखान्याविषयी माहिती दिली. जर तुम्हाला कत्तलखाना बघायचा असेल तर औरंगाबादला ब्रुक बॉन्डचा कत्तलखाना अतिशय चांगला आहे. या कत्तलखान्यामध्ये कुठल्याही प्रकारचा वास येत नाही. आपण जर कत्तलखान्यासमोर उभे राहीलो तरी त्या ठिकाणी कुठल्याही प्रकारची दुर्गंधी येत नाही. औरंगाबादला पैठण रोडवर ब्रुक बॉन्डचा कत्तलखाना आहे. तो कत्तलखाना हायवेला लागून आहे. परंतु, तिथुन जाताना देखील कधी वास येत नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, तुम्ही बोलता ते बरोबर आहे आणि तुम्ही योग्यप्रकारे माहिती दिलेली आहे. परंतु, उत्तनला जे सध्या ठिकाण आहे, आपल्याला त्याबाबत उत्तनची निश्चित जागा समजलेली नाही. त्याचे सर्व डिस्पोजल किंवा पाणी कुठेतरी खाडीला मिळाले पाहिजे आणि ते पाणी खाडीवाटे कुठेतरी बाहेर निघाले पाहिजे. आपल्याकडे नॅशनल हायवेवर कोरा केंद्र आहे. तिकडे मुंबईवरुन इकडची तिकडची सगळी जनावरे आणली जातात. तिथे त्या जनावरांचे चांगल्या पध्दतीने काटछाट केली जाते. त्याचे जे काही वेस्टेड आहेत त्या खाडीमार्फत आपल्या खाडीला मिळते. अशा पध्दतीने हा स्पॉट आहे का? त्याची प्रथम पाहणी करा. हा स्पॉट उत्तनला नक्की कुठे आहे ते बघा. जेणेकरुन त्यांचे डिस्पोजल खाडी किंवा समुद्राला मिळेल. इकडे तिकडे गडबड, गोंधळ होण्यापेक्षा प्रथम वेस्टेजची सोय करा. आपण केंद्रशाशीत पैशावर कत्तलखाना बांधणार आहोत हे बरोबर आहे. आपला त्याच्यामध्ये काही सहभाग असेल आणि तो सहभाग व्हायला पाहिजे. आज मिरा भाईंदर शहर वाढत आहे. त्याच्या जोडीला कत्तलखनेसुध्दा व्हायला पाहिजे. परंतु, ते कत्तलखाने कुठेतरी एका बाजूला किंवा खाडीच्या बाजूला व्हायला पाहिजे. जेणेकरुन आपल्या कुठल्याही नागरिकांना त्याच्या दुर्गंधीचा त्रास होता कामा नये.

**प्रभात पाटील :-**

मा. सभापती महोदय, आतापर्यंत कत्तलखान्याविषयी जी चर्चा झाली किंवा आपल्या सन्मा. सदस्यांनी या विषयावर चर्चा केली. आपल्या सन्मा. सदस्यांना प्रशासनाकडून जे काही अपेक्षीत आहे त्या संदर्भात त्यांनी काही सुचना मांडल्या. मला असे वाटते की, सिटी इंजिनियर आणि डॉ. बावस्कर यांनी या संदर्भात अतिशय चांगली माहिती दिलेली आहे. आपले पुढे पडणारे पाऊल हे शहराच्या विकासाच्या दृष्टीने पडायला पाहिजे. या ठिकाणी कत्तलखाने आवश्यक आहेत. आपल्याला १०० टक्के अनुदान मिळत असेल तर शहरामध्ये इतरत्र विखुरलेली मटणाची दुकाने एकत्रितरित्या एका ठिकाणी व्हायची असतील तर आपण या संदर्भातील पाऊल म्हणून या कत्तलखान्यासाठी या एजन्सीला प्राधान्य द्यावे. आपण या एजन्सीची मंजूरी घ्यावी किंवा त्यांना मंजूरी द्यावी असा मी या ठिकाणी ठराव मांडत आहे.

**एस. ए. खान :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**गजानन भोईर :-**

आपल्या मिरा भाईंदरमध्ये कमीत कमी पंचवीस ते तीस हजार बकरे दर गुरुवारी विकतात, याची माहिती आहे का? त्याच्यानंतर आपल्या मिरा भाईंदरमध्ये ते बकरे कापले जातात याची कोण तपासणी करते. का? दर गुरुवारी जनतानगर झोपडपट्टीमध्ये असे चालते.

**मिलन पाटील :-**

याबाबतची संपूर्ण माहिती श्री. संभाजी पानपट्टे साहेबांना विचारा.

**एस. ए. खान :-**

जर कत्तलखान्याची प्रोव्हिजन तर आपल्याला ते करता येईल.

**रतन पाटील :-**

साहेब, आपल्या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोकादायक आहे. मग तुम्हाला पाहणी करायला नको का?

**एस. ए. खान :-**

परंतु, आता कोणाचे नियंत्रण नाही.

**रतन पाटील :-**

तुम्ही आता लक्ष ठेवा.

**एस. ए. खान :-**

कत्तलखाना झाल्यानंतर सर्वांवर लक्ष ठेवले जाईल. आपण याबाबत प्रोव्हिजन केलेली आहे का?

**मिलन पाटील :-**

ठराव मंजूर झाल्यानंतर तुम्ही हा विषय घ्या.

**एस. ए. खान :-**

हा एक चांगला विषय आहे.

**रतन पाटील :-**

हा विषय या ठिकाणी आलेला आहे हे बरोबर आहे. परंतु, हा विषय नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने महत्वाचा विषय आहे.

**मोहन पाटील :-**

आपण त्याच्यासाठी तांत्रिक सल्लागार नेमणार आहोत. त्या तांत्रिक सल्लागाराने सल्ला दिल्यानंतर आपल्याला ठरवायचे आहे.

**गजानन भोईर :-**

आपल्याकडे किती बकरे कापले वगैरेची माहिती आहे का?

**रतन पाटील :-**

डॉ. बावस्कर हे सल्लागार नसून डॉक्टर आहेत.

**मोहन पाटील :-**

आपल्याकडे ती माहिती उपलब्ध आहे. ती माहिती प्रशासनाला दिलेली आहे.

**गजानन भोईर :-**

आतापर्यंत किती बकरे कापले? त्याबाबतची माहिती प्रशासनाने द्यावी.

**मोहन पाटील :-**

आता हा विषय या ठिकाणी नाही. त्यामुळे याबाबतची माहिती पुढच्या मिटींगला देण्यांत येईल.

**दिपक खांबित :-**

ह्याबाबतची माहिती तपासणी करुन देण्यात येईल.

**रतन पाटील :-**

मग डॉ. बावस्कर हे सल्लागार होणार आहेत का?

**गजानन भोईर :-**

तुम्ही सल्लागाराची नेमणूक नंतर करा. आपल्या महानगरपालिकेला ह्याच्यामध्ये काय माहिती आहे ते सांगा.

**एस. ए. खान :-**

किती बकरे येतात? काय येतात? त्याची माहिती घ्या.

**जयंत पाटील :-**

मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर मला अजूनपर्यंत मिळालेले नाही. माझा प्रश्न असा होता की, ही संस्था त्या कामासाठी लायक आहे का?

**प्रभात पाटील :-**

या ठिकाणी त्या संस्थेचे नाव दिलेले आहे.

**जयंत पाटील :-**

या ठिकाणी संस्थेचे नाव दिलेले आहे.

**दिपक खांबित :-**

ती संस्था नसून त्या गव्हर्नमेन्टच्या गाईडलाईन्स आहेत. आपण त्याच्यानुसार सगळा प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करणार आहोत.

**एस. ए. खान :-**

त्या संस्थेच्या गाईडलाईन्स आहेत असे त्यांचे म्हणने आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही दिलेल्या टिपणी किंवा गोषवाऱ्यामध्ये सरळ लिहलेले आहे की, दी डिपार्टमेन्ट ऑफ ॲनिमली हजबन्डरीज ॲन्ड डेरीज, न्यु दिल्ली नुसार प्रकल्प अहवाल तयार करावा लागतो.

**दिपक खांबित :-**

दी डिपार्टमेन्ट ऑफ ॲनिमली हजबन्डरीज ॲन्ड डेरीज यांच्या गाईडलाईन्सनुसार प्रकल्प अहवाल तयार करायचे आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही यांचा पत्रव्यवहार कोणाकडे करणार?

**दिपक खांबित :-**

आपल्याकडे त्यांच्या सगळ्या गाईडलाईन्स आहेत. त्यांचे बुकलेट आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही कुठल्या सल्लागाराला बोलावणार आणि तुम्ही पत्रव्यवहार कोणाला करणार आहात?

**दिपक खांबित :-**

आपण अगोदर टेन्डर काढणार आणि ह्याच्यामध्ये जे निष्ठावित आहेत, ज्यांनी ह्याच्यापूर्वी कामे केलेली आहेत त्यांच्याकडून टेन्डर मागवणार आणि आपल्याला त्याच्यामध्ये जे कोणी चांगले वाटतील आपण त्यांचा विषय पुन्हा समितीपुढे ठेवणार आहोत.

**जयंत पाटील :-**

तुमच्या गोषवारासुध्दा अर्धवट आलेला आहे.

**सुर्यकांत पाटील :-**

हा विषय कशाशी रिलेटेड आहे.

**दिपक खांबित :-**

कत्तलखान्याचा विषय बांधकाम विभागाकडे जातो.

**प्रकरण क्र. १३२ :-**

कत्तलखाना बांधणे कामाकरिता तांत्रीक सल्लागार नेमणेस मान्यता देणे.

**ठराव क्र. १३६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत मंजूर विकास आराखड्यात आरक्षण क्रमांक २९ ही जागा कत्तलखाना करीता आरक्षित आहे. सदर जागा हस्तातरणाबाबत प्रशासनामार्फत कार्यवाही सुरु असून मा. महासभा दि. ०३/०८/२००४ ठराव क्र. ३५ अन्वये कत्तलाखाना बांधणे कामी सर्व आवश्यक कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर कत्तलखाना बांधणे ही विशेष बाब असल्याने तसेच सदर कामाकरीता केंद्र शासनाचा कृषी विभागाच्या मार्गदर्शक तत्व व सुचना तसेच Department of Animal Husbandary and Daries, New Delhi नुसार प्रकल्प अहवाल तयार करावा लागणार असून त्यास राज्य शासन व केंद्र शासनाची मान्यता सुद्धा घ्यावी लागणार आहे. सदर कत्तलखाना बांधणे कामाचा प्रकल्प अहवाल, तांत्रिक अहवाल, Civil layouts/Civil structural / Mechanical / electrical / Effluent disposal components, drawing / plans अंदाजपत्रक इत्यादी तयार करुन प्रथम मान्यते करीता सादर करावे लागणार आहे. ही सर्व कामे करण्याकरीता या क्षेत्रात अनुभव असणारे तांत्रिक सल्लागार नेमावा लागणार आहे. सदर कामी तांत्रिक सल्लागार नेमून त्यांच्याकडून सादर करण्यात येणाऱ्या अंदाजपत्रकास मा. महासभेची मान्यता घ्यावी लागणार आहे. तरी या क्षेत्रात अनुभवी असणारा तांत्रिक सल्लागारा नेमणेकरीता स्पर्धात्मक निविदा मागविण्यास व खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. प्रभात पाटील.** **अनुमोदन :- श्री. ॲड. एस्. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १३३ चे वाचन केले.)

**प्रभात पाटील :-**

दै. वृत्तमानसमध्ये दोन ठेके आले परंतु, एकंदर चार कामे होती असे मला वाटते. या ठिकाणी फक्त तीन कामेच मंजूरीला आलेली आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

दै. सुरजप्रकाशमध्ये सर्व कामे आलेली आहेत.

**दिपक खांबित :-**

तीनच कामे होती. सन्मा. सदस्या प्रभात पाटील, तुम्ही ज्या कामांचे बोलता ते दोन दिवसापूर्वीच्या कामाचे बोलत आहात. त्याबाबतचे टेन्डर अजूनपर्यंत निघालेले नाही. ती कामे पुढच्या वेळेला येतील.

**गजानन भोईर :-**

कालची चारही टेन्डर झाली का?

**प्रेमनाथ पाटील :-**

कालची चारही टेन्डर झाली का?

**दिपक खांबित :-**

जी टेन्डर आलेली आहेत ती आपण काढूया. पुढच्या वेळेला कार्यवाही करुन पुढची टेन्डर घेऊया.

**सुर्यकांत भोईर :-**

मी मागच्या मिटींगला इतिवृत्तांना पास करताना ठराव मांडलेला होता की, जी-जी कामे झालेली नाहीत किंवा जी कामे कुठल्या प्रोसेसमध्ये असतील तर तुम्ही आम्हाला याचा अहवाल या मिटींगमध्ये द्या. तो अहवाल कुठे आहे?

**कैलासबेन जानी :-**

तुम्ही गेल्या मिटींगला पाठपुरावा देणार होतात. तुम्ही आम्हाला तो अहवाल दिलेला नाही.

**मा. सभापती :-**

मागच्या मिटींगमधील विषय संपलेला आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही आम्हाला अहवाल द्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

परवाच्या दिवशी आपली चार टेन्डर झाली. ती चारही टेन्डर पास झाली का?

**दिपक खांबित :-**

आपण ती टेन्डर भरलेली आहेत. परंतु, आपल्यालाती टेन्डर ओपन करुन सादर करायची आहेत.

**प्रेमनाथ पाटील :-**

आम्हाला असे ऐकायला मिळाले आहे की, एक टेन्डर उशीरा म्हणजे वेळ संपल्यावर टाकलेले आहे.

**गजानन भोईर :-**

तुम्ही सोनी कन्ट्रक्शनचे टेन्डर ३.०० वाजता स्विकारले.

**प्रेमनाथ पाटील :-**

सोनी कन्ट्रक्शनचे टेन्डर १२.३० वाजता स्विकारले गेले.

**गजानन भोईर :-**

सोनी कन्ट्रक्शनचे टेन्डर उशीरा स्विकारले गेले. सोनी कन्ट्रक्शनच्या टेन्डरमध्ये काय स्पेशलिटी आहे? सोनीला ब्लॅकलिस्टमध्ये टाकलेले आहे.

**प्रभात पाटील :-**

सोनीला ब्लॅकलिस्टमध्ये टाकण्याचा स्थायी समितीचाच निर्णय आहे.

**गजानन भोईर :-**

सोनी कन्ट्रक्शनवाल्यांनी ३.१५ वाजता फॉर्म भरल्याचे बोलले जाते. आपण त्याला ब्लॅकलिस्टमध्ये टाकण्याचे चार मिटींगपासून ओरडत असताना त्या टेन्डरला स्पेशल कामे दिली जातात. सोनीला कुठले कन्ट्रक्शन काम येंते?

**प्रेमनाथ पाटील :-**

सोनी ए-वन कन्स्ट्रक्शन काम देते.

**प्रभात पाटील :-**

सोनीला ब्लॅकलिस्टमध्ये टाकावे असा स्थायी समितीचा ठराव आहे. आपण याच्या पलिकडे जाउन त्यांना डोक्यावर घेत आहोत.

**प्रेमनाथ पाटील :-**

परंतू, आपण त्याची एन्ट्री उशीरा केलेली आहे

**गजानन भोईर :-**

तुम्ही त्याची माहिती घ्या. त्याला कुठली कंपनी काम देईल तर आपण तिचेसुद्धा नाव ब्लॅकलिस्टमध्ये टाकू असेसुद्धा त्यावेळेला बोलले होते. तरी सूद्धा सोनी कन्स्ट्रक्शनला स्पेशल कामे दिली जातात. त्याच्यामध्ये असे काय स्पेशल आहे? तो खास कोणाचा माणूस आहे.

**एस. ए. खान :-**

त्याबाबतची चौकशी करायला पाहिजे.

**कैलासबेन जानी :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह यांचा ठराव आहे.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलू इच्छितो की एखाद्या ठेकेदाराला काळया यादीमध्ये टाकण्याकरीता जर एखाद्या समितीने निर्देश दिले तर ते संपूर्ण प्रशासनाचे काम आहे. प्रशासनाने काय काम केले की केले नाही तुम्ही ही माहिती मागवा.

**गजानन भोईर :-**

तूम्ही माहीती मागा मग विषय मांडायची काय गरज आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, त्या कन्स्ट्रक्शनने १२ वाजता निविदा दिलेली आहे आणि १२.३० वाजता त्याची निविदा स्विकारलेली आहे.

**दिपक खांबित :-**

सगळ्या ठेकेदारांची निविदा पेटी ठिक १२ वाजता सर्व ठेकेदारांसमक्ष सह्या घेउन निविदा सील केलेली आहे.

**गजानन भोईर :-**

चारही टेन्डर सील झालेले आहेत का?

**दिपक खांबित :-**

चारही टेन्डरची निविदा सील झालेले आहे.

**गजानन भोईर :-**

चारही टेन्डर सील झाले ना?

**दिपक खांबित :-**

जे टेन्डर असतील ते सील झालेले आहेत.

**गजानन भोईर :-**

काहीतरी माहिती तूमच्याकडे असेल. पेपरमध्ये टेन्डरबाबत इन्क्वायरी झालेली होती

**दिपक खांबित :-**

जे टेन्डर आले ते १२ वाजता पेटीमध्ये टाकून सील करून सगळ्यांच्या समक्ष सह्या झालेल्या आहेत.

**गजानन भोईर :-**

आपण रिकॉल टेन्डर दिले का?

**दिपक खांबित :-**

आपण रिकॉलचे टेन्डर उघडणार तेव्हा आपल्याला माहिती पडेल.

**प्रेमनाथ पाटील :-**

काही ह्याच्यामध्ये फक्त एक निविदा आलेली आहे. मग त्याचे काय करणार?

**दिपक खांबित :-**

आपण त्याचा अहवाल तयार करू.

**प्रेमनाथ पाटील :-**

अहवाल तयार करण्याचा प्रश्न नाही परंतू, सात-आठ जणांनी फॉर्म भरलेले होते. त्या लोकांनी का भरला नाही.

**दिपक खांबित :-**

तूम्ही सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

मी काय सांगू? तूम्ही सांगा.

**दिपक खांबित :-**

आम्ही टेन्डर काढतो. टेन्डर ओपन असतात. कोणीही येउन टेन्डर भरून घ्यावे. कोणी टेन्डर भरले नाही तर आपण कोणावर जबरदस्ती करू शकत नाही. ज्याला टेन्डर भरायचे असेल तो टेन्डर भरू शकतो. आपण पोलीस बोलवतो. आपण पोलिस बंदोबस्तसूद्धा घेतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्हाला आपल्या महानगरपालिकेचा अपमान वाटतो का? मी पोलिस बंदोबस्ताचे विचारत नाही. अग्रवाल किंवा कुठल्या तरी एक व्यक्तीने जकातीची कोरी निविदा टाकलेली होती असे मला वाटते. ते सुद्धा तसेच झाले. म्हणजे त्याला आपल्या महानगरपालिकेची व्हॅल्यू नाही असे वाटते.

**दिपक खांबित :-**

त्याचे जे टेन्डर असतील ते आपण करून पूढच्या मिटींगला ठेवतो. तेव्हा तूम्ही या विषयावर बोला.

**गजानन भोईर :-**

तो विषय येईल तोपर्यंत टेन्डर पास होतील.

**प्रेमनाथ पाटील :-**

तूम्ही चारही टेन्डर ओपन करा.

**प्रभात पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, सोनी कन्स्ट्रक्शनबाबत आमची शंका असल्यामुळे तूम्ही प्रशासनाला विचारू शकता.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही काही बोलत नाहीत तुम्ही प्रशासनाला विचारा.

**मा. सभापती :-**

हा विषय मी सभापती पदावर नव्हतो. तेव्हा झालेला आहे

**रतन पाटील :-**

परंतु, तुम्ही याबाबत प्रशासनाला विचारा

**मा. सभापती :-**

आता जी मिटिंग झाली त्याची माहिती पूढच्या वेळेला देण्यात येईल.

**गजानन भोईर :-**

मा. सभापतीसाहेब, तुम्ही अधिका-यांना आता या क्षणी विचारा. नंतर कार्यवाही करायची की नाही करायची हे नंतर बघू.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. सभापतीसाहेब,आता आपल्या ज्या चार निविदा आलेल्या आहेत.

**मा. सभापती :-**

चार निविदा आलेल्या आहेत की दहा निविदा आलेले आहेत हे मला माहीती नाही, तुम्ही याच्यामध्ये संबंधित आहात म्हणून विचारता.

**प्रेमनाथ पाटील :-**

आम्ही याच्यामध्ये कुठे संबंधित आहोत? या ठिकाणी संबंधित असण्याची प्रश्न येत नाही.

**मा. सभापती :-**

यांचा संबंधित असल्याचा अर्थ होतो किती जणांच्या निविदा क्लिअर झाल्या? रू.१२ लाख किती झाले? हे तूम्हाला माहिती पाहिजे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही हे सर्व संबंधित अधिका-याला विचारले पाहिजे.

**गजानन भोईर :-**

त्याचे काय झाले होते? वगैरे तूम्हाला कळले पाहिजे. तो तूमचा अधिकार आहे.

**मा. सभापती :-**

ते माझे अधिकार असले तरी मी त्या पेट्या चेक करायला जाणार नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही पेट्या चेक करा असे आम्ही तूम्हाला सांगत नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

अधिका-यांना विचारण्याचे तूमचे काम आहे.

**मा. सभापती :-**

तुम्ही मला ज्या कामाची विचारणा अधिका-याकडे करायला सांगीतली. मी त्या कामाची विचारणा अधिका-याकडे निश्चिपणे करणार.

**गजानन भोईर :-**

तुम्ही आता अधिका-यांना विचारावे असेच आमचे म्हणणे आहे.

**मा. सभापती :-**

आता या ठिकाणी जो विषय आलेला आहे, तो विषय मागच्या मिटींगचा आहे पुन्हा जेव्हा तो विषय येईल तेव्हा तूम्ही विचारा.

**सुर्यकांत भोईर :-**

आता या ठिकाणी अधिकारी उपस्थित आहेत त्यामूळे तुम्ही अधिका-यांना आता विचारा.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, चार निविदा आलेल्या होत्या तुम्ही त्या चार निविदा ओपन कधी करणार?

**प्रभात पाटील :-**

अजूनपर्यंत सगळ्या निविदा दिलेल्या नाहीत.

**गजानन भोईर :-**

सगळ्या निविदा दिवाळीनंतर देणार आहात का?

**प्रेमनाथ पाटील :-**

ह्या चार निविदा दिलेल्या आहेत. ह्या ओपन कधी करणार? मला वाटले की, त्या दिवशी ओपन करतील.

**दिपक खांबित :-**

आम्ही त्या निविदा ओपन करणार आहोत.

**प्रेमनाथ पाटील :-**

तूम्ही दोन मिनिटांपूर्वी नाही बोलले होते.

**दिपक खांबित :-**

साहेब, बोलले की, ओपन झालेली आहे.

**गजानन भोईर :-**

एकही टेन्डर रिकॉल झालेले नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

एकही टेन्डर रिकॉल झालेले नाही ना?

**गजानन भोईर :-**

एकही टेन्डर रिकॉल झालेले नाही.

**दिपक खांबित :-**

आता कॉम्प्यूटरवर बघावे लागेल.

**शरदचंद्र वैरागडे :-**

कॉम्प्यूटरवर बघितले नसल्यामूळे कॉम्प्यूटरवर बघून टेन्डर रिकॉल करावे लागेल.

**प्रेमनाथ पाटील :-**

समजा, मी सात जणांचे फॉर्म आले आणि त्याच्यामधे एकाने निविदा टाकली तर ती निविदा तूमच्या रेटनूसार योग्य असेल तर तूम्ही त्या निविदा स्विकारणार की नाही ते मला विचारायचे होते.

**दिपक खांबित :-**

श्री. शरदचंद्र वैरागडे साहेब, सन्मा. प्रेमनाथ पाटील यांचे असे म्हणणे आहे की, एका कामावर फक्त एक टेन्डर आले. जर त्या टेन्डरचे रेट बरोबर असतील तर तुम्ही ते टेन्डर स्विकारणार की नाही.

**शरदचंद्र वैरागडे :-**

आम्ही ते टेन्डर स्विकारलेले आहे. ते टेन्डर ॲक्सेप्ट करायचे की नाही ते मा. आयूक्त साहेबांवर अवलंबून आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

जर एखादे टेन्डर रेटनूसार दिलेले असेल आणि ते टेन्डर आपल्याकडे आले असेल तर तुम्ही ते टेन्डर स्विकारणार की नाही स्विकारणार.

**शरदचंद्र वैरागडे :-**

जे एक टेन्डर आलेले आहे, ते टेन्डर आम्ही अजूनपर्यंत उघडलेले नाही. आम्ही ते टेन्डर मा. आयूक्तसाहेबांच्या आदेशानुसार उघडणार आहोत.

**प्रेमनाथ पाटील :-**

महानगरपालिकेच्या रेटप्रमाणे टेन्डर असेल तर तुम्ही ते टेन्डर स्विकारणार की नाही.

**शरदचंद्र वैरागडे :-**

त्या टेन्डरबाबत मा. आयुक्त साहेबांचे जे आदेश असतील त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

(सन्मा. सदस्य श्री. मोहन पाटील ह्यांनी सभागृहात ठरावाचे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १३३ :-**

निविदांना मंजुरी देणे (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. १३७ :-**

**दि. ३१.०८.२००५ रोजी ''दैनिक महाराष्ट्र जनमुद्रा''**

| **अ.क्र.** | **कामाचं नांव / ठेकेदाराचे नांव** | **अंदाजीत रक्कम** |
|---|---|---|
| १. | रा.म.क्र. ८ वरील छत्रपती शिवाजी महाराज मार्ग येथे विनयनगर मधिल झंकार कंपनी ते पुजापार्क पर्यंतचा रस्ता खडीकरण करणे. | रु. १४,०८,८५०/- |
| | १) मे. श्री. ट्रेडर्स | ०.०१% कमी दराने |
| | २) मे. व्ही. पी. अहिरे | ४.००% जास्त दराने |
| | ३) मे. एस. एम. कन्स्ट्रक्शन | ५.००% जास्त दराने |

| अ.क्र. | कामाचं नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजीत रक्कम |
|---|---|---|
| | ४) मे. गुरुदत्त कन्स्ट्रक्शन | ५.००% जास्त दराने |
| २. | भाईंदर (पू.) येथे काशिमिरा रोडवरील शिवार तलावाच्या सभोवताली कंपाऊंड वॉल, ग्रील व जॉगिंग ट्रॅक बनविणे.<br>१) मे. स्टार कन्स्ट्रक्शन (दरवाटाघाटीनंतर)<br>२) मे. गुरुजी कन्स्ट्रक्शन<br>३) मे. आशापूरा कन्स्ट्रक्शन<br>४) मे. सुरेश एच. रत्तावा | रु. २५,००,०००/-<br>४.००% जास्त दराने<br>अंदाजपत्रक दराने<br>६.००% जास्त दराने<br>८.००% जास्त दराने<br>१२.००% जास्त दराने |

**दि. ०५.०९.२००५ रोजी ''दैनिक वृत्तमानस''**

| अ.क्र. | कामाचं नांव / ठेकेदाराचे नांव | अंदाजीत रक्कम |
|---|---|---|
| ३ | प्रभाग क्र. १० मध्ये घोडबंदर येथे हिंदू स्मशानभूमी व मुस्लीम दफनभूमी विकसित करणे.<br><br>१) मे. एम.एस. इन्टरप्रायजेस (दरवाटाघाटीनंतर)<br>२) मे. गजानन कन्स्ट्रक्शन<br>३) मे. एस. एच. रतावा<br>४) मे. ॲनायडा इन्टरप्रायजेस | रु. ४६,५८,८२१/-<br><br>३.००% कमी दराने<br>अंदाजपत्रक दराने<br>१०.८% जास्त दराने<br>१३.००% जास्त दराने<br>१५.५% जास्त दराने |

**दि. १७.०९.२००५ रोजी ''दैनिक सकाळ व सुरज प्रकाश''**

**१) मे. पी. एन. शिदोरे ॲन्ड कंपनी**

| अ.क्र. | तपशिल | दर प्रति (चौ. मीटर) | मुदत |
|---|---|---|---|
| ४. | मिरा भाईंदर महानगरपालिका मंजुर विकास आराखड्यातील आरक्षित जागेचे सर्वेक्षण करुन जागा महानगरपालिकेच्या ताब्यात येवून महसुली अभिलेखी महानगरपालिकेचे नावे नोंद होईपर्यंत कारवाई करणे | ६००० चौ.मी. पर्यंतच्या आरक्षणास प्रति रु. ४८/- चौ.मी.<br>६००० चौ.मी. वरील आरक्षणास प्रति रु. ३८/- चौ.मी. (शासकीय फी चा भरणा महानगरपालिकेने करावा) | १२ महिने |

**२) मे. मोनार्क सर्व्हेअर ॲन्ड कंन्स्ट्रक्शन**

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | मिरा भाईंदर महानगरपालिका मंजुर विकास आराखड्यातील आरक्षित जागेचे सर्वेक्षण करुन जागा महानगरपालिकेच्या ताब्यात येवून महसुली अभिलेखी महानगरपालिकेचे नावे नोंद होईपर्यंत कारवाई करणे | ६००० चौ.मी. पर्यंतच्या आरक्षणास प्रति रु. ५०/- चौ.मी.<br>६००० चौ.मी. वरील आरक्षणास प्रति रु. ४०/- चौ.मी. (शासकीय फी चा भरणा महानगरपालिकेने करावा) | १२ महिने |

**३) मे. राणे मॅनेजमॅन्ट कंन्स. प्रा. लि.**

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | मिरा भाईंदर महानगरपालिका मंजुर विकास आराखड्यातील आरक्षित जागेचे सर्वेक्षण करुन जागा महानगरपालिकेच्या ताब्यात येवून महसुली अभिलेखी महानगरपालिकेचे नावे नोंद होईपर्यंत कारवाई करणे | ६००० चौ.मी. पर्यंतच्या आरक्षणास प्रति रु. ४५/- चौ.मी.<br>(दर वाटाघाटीनंतर रु. ४०/- चौ.मीटर सर्व शासकीय भरणासहीत)<br>६००० चौ.मी. वरील आरक्षणास प्रति रु. ३५/- चौ.मी. (शासकीय फी चा भरणा महानगरपालिकेने करावा)<br>(दर वाटाघाटीनंतर रु. २२/- चौ.मी. शासकीय फी चा भरणासहीत) | १२ महिने |

अ.क्र. १ करीता मे. श्री. ट्रेडर्स यांची अंदाजपत्रकातील दरापेक्षा ०.०१% कमी दराची निविदा, अ.क्र. २ करीता मे. स्टार कंन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकातील दराची निविदा, अ.क्र. ३ करीता मे. एम. एस. एन्टरप्राईजेस यांची अंदाजपत्रकातील दराची निविदा, अ.क्र. ४ करीता मे. राणे मॅनेजमेंट कंन्सलंट प्रा. लि.

यांची दर वाटाघाटी नंतरची निविदा ह्या वाजवी असून मंजूर करण्यात येत आहेत. तसेच ठेकेदाराची वेळोवेळी येणारी देयके प्रदानास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील. अनुमोदन :- श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १३४ चे वाचन केले)

**मोहन पाटील :-**

मा. सभापतींच्या परवानगीने आणि सदस्यांच्यावतीने बोलतो. कारण ह्या विषयाची चर्चा मागच्या वेळेला झालेली होती, म्हणून मी या ठिकाणी मुद्दाम बोलतो की अशी समाजमंदिरे भाड्याने द्यायची या विषयावर मागच्या वेळेला चर्चा झालेली होती. आपली अशी बरीच समाज मंदिरे भाडयाने दिली गेलेली आहेत. याबाबत बरेच करारनामे केलेले आहेत. मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे ते करारनामे उपलब्ध नाहीत. मागच्या वेळेला हा विषय आला तेव्हा सदर समाजमंदिरांकडे जवळजवळ रू. २ लाख २० हजार थकबाकी बाकी असल्याचे समजले. ते कोणत्या सदस्याला द्यावे किंवा देउ नये हा नंतरचा विषय आहे. कारण जी समाजमंदिरे बांधलेली आहेत त्याच्यामध्ये विकासकामे होत असतील चांगले काम असेल, कोणती संस्था काम करत असेल किंवा त्या संस्थेमार्फत त्या नागरिकांना सुविधा मिळत असतील किंवा समाजाच्या विकासाची कामे होत असतील तर ती कामे केली पाहीजेत, या विषयाबाबत आमचे दुमत नाही. परंतू, जर मागच्या महिन्यांचे रू. २ लाखांचे बिल बाकी असेल आणि जर ते बिल या ठिकाणी पूर्णपणे आले नाही. आपण हे काम ज्या संस्थेला दिले होते आपल्याकडे त्या व्यक्तीने मागणी केलेली आहे. ती व्यक्ती त्या संस्थेकडे काम करत होती आणि त्या व्यक्तीला पुन्हा समाजमंदिर द्यायचे म्हणून आपण गोषवाऱ्यामध्ये स्पेसिफिक नमुद केले. त्याच्यानंतर त्यांचे जे रू. २ लाखांचे बिल आहे ते वसुल करण्याचा भानगडीत न पडता, ते बिल वसूल करण्याकरिता प्रयत्न न करता आपण पुन्हा ही समाजमंदीरे त्या व्यक्तीला भाड्याने देण्याचे प्रयत्न करित आहोत, ही अतिशय चुकीची पद्धत आहे. तुम्ही मिरा-भाईंदर महानगरपालिकेचा रेव्हेन्यु बुडवु नका. ती संस्था कुठली आहे, कोण काम करते हा एक वेगळा भाग आहे. आम्ही त्याच्या साठी या ठिकाणी बोलत नाही. परंतू, त्या संस्थेने रू २ लाख दिलेले नाहीत हा एक भाग झाला. आपल्याकडे अशी इतर समाजमंदिरे आहेत, त्यांचे पैसे व्यवस्थीत येतात का? त्याची बिले, थकबाकी वगैरे आलेली आहेत की नाही किंवा येतात की नाही तुम्ही याचा सर्व तपशील या ठिकाणी आणावा. मागच्या वेळेला सर्व सन्मा. सदस्यांनी या ठिकाणी स्पष्टपणे भुमिका मांडलेली होती. परंतु, ते रू. २ लाख वसुल न करता तुम्ही ते तसेच ठेवलेले आहेत की वसुल केले की आपण त्यांना नोटीसा पाठवल्या आपण त्यांना कोणत्या पद्धतीचे प्रयत्न केले ते या ठिकाणी मांडा. ते समाजमंदिर पुन्हा दुसऱ्या कोणाला तरी देणे योग्य नाही. ही चुकीची पद्धत आहे. संस्थेला काम देउ नये संस्थेला समाजमंदिर देउ नये या मताचा मी नाही. संस्थेला समाजमंदिरे दिली तर आपल्याला त्या पैशांचे संपूर्णपणे मेन्टेनन्स होईल. ते समाजमंदिर किंवा ती सेवा संपूर्ण घटकापर्यंत पोहचू शकते आणि ती सेवा सर्वांना कळू शकते. परंतू, हे रूपये दोन लाखाचे जे बिल बाकी आहे त्याचे काय केले ते सभागृहापुढे आणावे. आम्ही प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना विरोध करतो असा भाग नाही. परंतु, प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी. जर तुम्ही रुपये दोन लाख निधी खात्यात टाकले असतील तर तसे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी जाहिर करावे. याविषयाबाबत पुर्णपणे निर्णय झाला पाहिजे आणि निर्णय झाल्यानंतर असे विषय आणावेत. असे प्रशासन आणि मा. सभापती महोदयांना सुचना देतो. मा. सभापती साहेब, असे विषय आणताना मी तूम्हाला असे सुचीत करतो की मागच्या वेळेला काय आहे ते बघा आणि मग रूलिंग द्या. उद्या आपल्यावर या कामाची आर्थिक जबाबदारी आहे. तूम्ही उद्या येणाऱ्या आर्थिक जबाबदारीमध्ये आम्हाला सामावून घेउ नका. कारण ते जे रू २ लाखाचे बिल बाकी आहे. त्याबाबत या सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. ते बिल वसुल करावे म्हणून आपण या ठिकाणी हा विषय पुन्हा आणलेला आहे. आपण त्याचे टेंन्डर कॅन्सल केला, त्यांना नोटीस पाठविली हा विषय होउ शकत नाही. वसुली बाबत काय प्रयत्न केले? कोणते पाउल उचलले? आपण या बाबत माहिती घ्यावी आणि नंतरच या ठिकाणी विषय आणावा.

**गजानन भोईर :-**

राई व्यायामशाळा भाड्याने देण्याचा हा विषय कोणाकडून आलेला आहे?.

**सुर्यकांत भोईर :-**

हा विषय कोणी आणला?

**मिलन पाटील :-**

हा तिसऱ्यांदा आलेला विषय आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

हा विषय तिसऱ्यांदा आलेला आहे.

**मिलन पाटील :-**

या विषयावर कोणाचा दबाव आहे का? एकदा सन्मा. सदस्य अशोक पाटील यांनी हा विषय फेटाळलेला होता.

**सुर्यकांत भोईर :-**

लाईटची बिलं कोणी भरायचे वगैरे सांगा.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य मी तूम्हाला या विषयाबाबत सांगतो की आपण एका बाईची ट्रान्सफर झाल्याचे पैसे भरले आणि पावत्या फाडल्या तरी आपण प्रशासनाच्या अधिकाऱ्याच्या कामामध्ये न जाता डोळेझाकपणा केला. या ठिकाणी या कामाची पुनरावृत्ती होत आहे. प्रशासनाच्या कोणत्या अधिकाऱ्याने काय केले आणि कोणत्या अधिकाऱ्याने पावत्या फाडल्या हा विषय आल्यावर कळेल त्या अधिकाऱ्याने पैसे भरले पाहिजे असे आम्ही तुम्हाला सांगत नाही तूम्ही एखाद्या अधिकाऱ्याला नोटीस देता, एका अधिकाऱ्याला खाली बसवता आणि एका अधिकाऱ्याला वर बसवता ही चुकीची पद्धत आहे. म्हणून आम्ही अधिकाऱ्यांना ज्या पद्धतीने सहकार्य करतो, तूम्ही आम्हाला काम करायला त्या पद्धतीने सहकार्य करा हा वेगळा भाग आहे. तुम्ही आम्हाला आर्थीक बाबींमध्ये गुंतवू नका ही आमची मा. सभापती महोदयांना विनंती आहे.

**गजानन भोईर :-**

मा. सभापती महोदय, या विषयात परत-परत गुंता वाढवायचा आहे का?

**कैलासबेन जानी :-**

साहेब टॅक्स डिपार्टमेंटने वसुली केलेली आहे, त्यांना नोटीस दिलेली आहे का? याबाबत टॅक्स डिपार्टमेंटला विचारा.

**गजानन भोईर :-**

आपला टॅक्स जाउ दे त्याचे रू २ लाखाचे मागच्या महिन्याचे बिल आहे.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेब, मिरा भाईंदर विभागामध्ये असणाऱ्या समाजमंदिरात आणखी काही व्यायामशाळा ज्या भाड्याने दिलेल्या आहेत त्याची भाडेपट्टी आणि इलेक्ट्रिसीटीचे बिल कोणी भरायचे याचा तपशील आणि हा विषय पुढच्या मिटिंगला येउ द्या.

**दिपक खांबित :-**

या व्यायामशाळेचे आदर्श सेवा मंडळ संस्थे बरोबर ॲग्रीमेंट झालेले होते. त्या ॲग्रीमेन्टनुसार सदरचे लाईट बिल महानगरपालिकेने भरायचे आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही ठरवलेले आहे, परंतू या ठिकाणी महानगरपालिकेने बिल भरायचे नाही असे दिलेले आहे.

**दिपक खांबित :-**

रिलायन्सकडे मागणी केलेली आहे.

**रतन पाटील :-**

तुम्ही एका ठिकाणी ॲग्रीमेंट ॲक्सेप्ट करता आणि एका ठिकाणी बोलता की बिलाची मागणी केलेली आहे.

**गजानन भोईर :-**

मागचे बिल महानगरपालिकेने भरायला पाहिजे होते.

**मोहन पाटील :-**

महानगरपालिकेने बिल का भरले नाही? अधिकाऱ्यांनी काय केले? ते सांगा ते बिल महानगरपालिकेने भरायचे नव्हते. ह्याच्यावर रूलिंग देउ नये.

**गजानन भोईर :-**

अधिकारी बोलतात की बिल महानगरपालिकेने भरायचे आहे अणि तुम्ही बोलतात की महानगरपालिकेने बिल भरायचे नाही.

**मोहन पाटील :-**

मग महानगरपालिकेने बिल का भरले नाही?

**गजानन भोईर :-**

एक जण बोलतो बैल कापायचे, एक जण बोलतो बकरे कापायचे आहेत. ह्याच्यामध्ये तूमचा ताळमेळ होतो की नाही.

**मोहन पाटील :-**

जर महानगरपालिकेने बिल भरायचे होते तर महानगरपालिकेने बिल का भरले नाही.

**रतन पाटील :-**

श्री. खांबीत यांनी सांगितले की ॲग्रीमेंन्ट मध्ये तसे नमूद केलेले आहे. जर आपण ॲग्रीमेंन्ट तसे बनविले असेल तर आपण बिल कसे देणार? त्याच्यामुळे तुम्ही आता हा विषय घ्या. जो ज्या विभागामध्ये काम करत असेल त्याचे कर्तव्य आहे. त्यांनी त्या विभागाचे बघायचे आहे.

**मा. सभापती :-**

सदर विषयाची संबंधित प्रशासनाच्या अधिका-यांनी माहिती घेउन हा विषय आणलेला होता. तरीसुध्दा या विषयाची पुर्तता करुन म्हणजेच रु. २ लाखाची पुतर्ता करुन हा विषय आणायचा आहे.

**प्रभात पाटील :-**

या विषयाचा खुलासा केलेला आहे. मा. सभापती साहेब आपणच या विषयाचा खुलासा करायचा आहे.

**गजानन भोईर :-**

महापालिका बील भरेल बोलल्यावर तुम्ही काय खुलासा करणार आहात?

**मा. सभापती :-**

काय-काय ॲग्रीमेन्ट केलेले आहे त्याचा खुलासा व्हायला पाहिजे. तो अहवाल अजूनपर्यंत दाखवलेला नाही.

**दिपक खांबित :-**

आम्ही त्या ॲग्रीमेन्ट रद्द केल्या.

**मा. सभापती :-**

या विषयाची मला पूर्णपणे माहिती देण्यांत यावी. आणि त्याप्रमाणे हा विषय रद्द करण्यांत येइल अशी मी सर्वांच्यावतीने विनंती करतो.

**कैलासबेन जानी :-**

ॲग्रीमेन्ट रद्द केली असेल तर महानगरपालिकेने पैसे कशाला भरायचे?

**मा. सभापती :-**

एकदा विषय झाल्यावर पुन्हा पुन्हा कशाला आणता?

**जयंत पाटील :-**

त्या बालवाड्यांमध्ये इलेक्ट्रीसिटीची पॉवर आणावीच लागणार आहे. किंवा तुम्हाला समाजमंदिरामध्ये वीज आणावीच लागणार आहे.

**मा. सभापती :-**

समाजमंदिरमध्ये वीज आणावीच लागेल.

**जयंत पाटील :-**

तुम्ही विषय रद्द केला तरी चालेल.

**मा. सभापती :-**

विषय क्र. १३४ हा रद्द करण्यात आलेला आहे.

**जयंत पाटील :-**

त्यांना कुठल्या अटीशर्तीनुसार बिले लावतात. तुम्ही ते सगळे मागवा.

**कैलासबेन जानी :-**

त्यांनी ॲग्रीमेन्ट कॅन्सल केले. मग महानगरपालिकेने पैसे कशाला भरायचे?

**प्रभात पाटील :-**

ॲग्रीमेन्ट आहे असे म्हटल्यानंतर बघायला लागेल.

**गजानन भोईर :-**

या विषयाची तीन मिटींगमध्ये चर्चा होत आहे. मग तुम्ही आता त्यांना बोलवा.

**कैलासबेन जानी :-**

ते एका बाईला सांगतात की अग्रीमेन्ट कॅन्सल झालेले आहे.

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब, तुम्ही तेव्हा मागच्या मिटींगला सभापती होतात, तेव्हा तुम्ही हा महानगरपालिकेचा बिल भरायचा विषय तुम्ही ऐकला होता का?

**मोहन पाटील :-**

त्यावेळेला आपण सवर्जण आणि मीसुध्दा त्या सदनामध्ये होतो. इलेक्ट्रीसिटीचे बिल का भरले जात नाही? याबाबत आपण सर्वांनी चर्चा केलेली होती. त्यावेळी अधिका-यांनी आपल्याला बिलं भरु नका असे सांगणारा विषय आलेला नव्हता. दुसरी गोष्ट म्हणजे आमच्याकडे याचे ओरिजनल करारनामे आहेत. असेसुध्दा आम्ही सांगितलेले नव्हते.

**सुर्यकांत भोईर :-**

त्याचे ॲग्रीमेन्टच उपलब्ध नाही.

**गजानन भोईर :-**

आमच्याकडे त्याचे ॲग्रीमेन्ट नाही.

**मोहन पाटील :-**

त्यांनी जे करारनामे मागवून घेतले तेव्हा त्यांनी आपल्याला खुलासा केलेला होता.

**प्रभात पाटील :-**

ते ॲग्रीमेन्ट आपल्याकडे उपलब्ध नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे.

**प्रकरण क्र. १३४ :-**

राई व्यायामशाळा भाड्याने देणेबाबत.

**ठराव क्र. १३८ :-**

मा. सभापती सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय नामंजूर करण्यांत आला.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १३५ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १३५ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. १३९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकरीता मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | मजूर संस्थेचे / कंत्राटदाराचे नांव |
|---|---|---|---|
| १ | गळती दुरुस्तीसाठी सी. आय.क्लॅम्पचा पुरवठा करणे. | ४,५०,९५०/- | सागरलक्ष्मी मजूर का. सं. म. ता. विक्रमगड |
| २ | भाईंदर पुर्व प्रभागातील गुप्ता बिल्डिंगसमोरील रस्त्यावर १५० मिमी व्यासाची लोखंडी जलवाहिनी टाकणे. | ६१,०३०/- | निखिल मजुर कामगार सह. संस्था मर्या. अंबरनाथ |
| ३ | पाली पंपिंग स्टेशनभेवती कुंपणभिंत बांधणे व आवारात कोबा करणे. | २,३८,८२८/- | प्रियजन मजुर कामगार सह. संस्था. मर्या., कल्याण |
| ४ | भाईंदर (प) डोंगरी येथील तलावली व शांतीनगर येथे जी.आय. जलवाहिनी टाकणे. | ४,५५,६७५/- | तपन मजुर कामगार सह. संस्था मर्या., शहापूर |
| ५ | मिरा एम.आय.डी.सी. येथील पाण्याच्या टाकीजवळ भूखंड विकसीत करणे. | ४,४०,४८३/- | शिवपुत्र मजुर कामगार सह. संस्था मर्या., भिवंडी |
| ६ | घोडबंदर येथील नियोजीन टाकीसाठी भुखंड विकसीत करणे. | ४,०४,९५०/- | विजय मजुर कामगार सह. संस्था मर्या., मोखाडा |
| ७ | भाटेबंदर येथे लाईट हाऊस जलकुंभाच्या आवारात कोबा करणे. | २,९१,३८५/- | तपन मजुर कामगार सह. संस्था मर्या., शहापूर |
| ८ | शिरे गाव येथे बुस्टर पंपरुम बांधणे व पंपिंग मशीनरी बसविणे. | १,७८,२५३/- | साकडबाव मजुर कामगार सह. संस्था मर्या., शहापूर |
| ९ | सिल्व्हर पार्क येथील टाकीच्या आवारात कॉंक्रीट गटार बांधणे. | २,९३,८०८/- | अंबिका मजुर कामगार सह. संस्था मर्या., शहापूर |
| १० | डोंगरी येथे मुख्य संतुलन टाकीची दुरुस्ती व इतर किरकोळ कामे करणे. | ४,०३,४९४/- | तपन मजुर कामगार सह. संस्था मर्या., शहापूर |
| ११ | उत्तन येथे शिरे गावठण येथे वितरण व्यवस्थेसाठी जी.आय. जलवाहिनी टाकणे. | ४,६२,९९१/- | साकडबाव मजुर कामगार सह. संस्था मर्या., शहापूर |
| १२ | काशी (जनता नगर) येथे संप व पंपहाऊस बांधणे. | रु. ९,३८,१९९/- | मे. ॲकॉर्ड मार्केटिंग ॲन्ड सर्विसेस |

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | मजूर संस्थेचे / कंत्राटदाराचे नांव |
|---|---|---|---|
| १३ | सिल्व्हर पार्क येथील टाकी परिसरात कोबा करणे. | रु. ४,४०,०७८/- | शिवपुत्र मजुर कामगार सह. संस्था मर्या., भिवंडी |
| १४ | स्लुस व्हॉल्वसाठी चेकनट स्पिंडल पुरवठा करणे. | रु. ४,६२,१५१/- | गोपाळकृष्ण मजुर कामगार सह. संस्था मर्या., भिवंडी |

सबब उपरोक्त प्रस्तावांचे मा. स्थायी समितीने अवलोकन केलेले आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १३६ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १३६ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (संगणक विभाग)

**ठराव क्र. १४० :-**

महानगरपालिका नागरी सुविधा केंद्र, प्रभाग कार्यालये व विविध विभागामध्ये संगणकावरील कामकाजाकरीता संगणक चालक ठेका पद्धतीने पुरवठा करणेकामी दि. ०४/०७/२००५ रोजी दै. नवशक्ती व दै. मुंबई संध्या या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहीर निविदा सुचनेनूसार खालीलप्रमाणे ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केल्या आहेत.

| अ.क्र. | तपशिल | मे. ध्रुव कॉम्प्युटर्स | मे. हेना इंटरप्राईजेस | मे. ॲपेक्स इंजिनिअरींग कॉर्पोरेशन |
|---|---|---|---|---|
| १. | संगणक चालक (ऑपरेटर) ठेका पद्धतीने पुरवठा करणे. | रु. १५१/-<br>प्र. दिवस<br>प्र. ऑपरेटर | रु. १६५/-<br>प्र. दिवस<br>प्र. ऑपरेटर | रु. १५९/-<br>प्र. दिवस<br>प्र. ऑपरेटर |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे. ध्रुव कॉम्प्युटर्स यांचे निविदेतील दर सर्वात कमी व वाजवी आहेत. सदरकामी सर्वात कमी दराची निविदा स्विकारणेंस मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेली आहे.

वरील प्रस्तावाचे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार अवलोकन करुन ही सभा मंजूरी देत आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १३७ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १३७ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (संगणक विभाग)

**ठराव क्र. १४१ :-**

महानगरपालिका नगरवाचनालय, अतिक्रमण, पाणी पुरवठा व प्रभाग समिती अध्यक्ष (सर्व) यांचे कार्यालय प्रभाग कार्याल, भाईंदर (पुर्व) व लेखाविभाग यांचे करिता संगणक, प्रिंटर व सी.डी. रायटर खरेदी करणेकामी दि. ०४/०७/०५ रोजी ''दै. सकाळ व दै. गावकरी'' या वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहीर निविदा सुचनेनुसार प्राप्त ७ निविदांपैकी १) मे. पेगासेल कॉम्प्युटर सर्विसेस व २) मे. प्रगती ट्रेडिंग कंपनी यांनी कागदपत्रांची पुतर्ता न केल्यानं त्यांचे लिफाफा क्र. २ (Commerical offer) उघडलेले नसुन उर्वरीत पाच ठेकेदारांचे दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | तपशिल | मे. केटक कॉम्प्युटर सर्विसेस प्रा. लि. | मे. पार इंटिग्रेटेड सिस्टीमर | मे. मॅग्नाशिअस सिस्टीम प्रा.लि. | मे. ऐस सोल्युशन अॅन्ड सर्विसेसे (इं) प्रा.लि. | मे. एच. सी. एल. इन्फोसिस्टीम लि. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | संगणक (कॉम्प्युटर) | (दर सर्व करासह ४७,८३९/- प्रति नग) (wipro) | (दर सर्व करासह ४२,३१०/- प्रति नग (wipro) | (दर सर्व करासह ४५,०००/- प्रति नग (HP compaq) | (दर सर्व करासह ४६,८७०/- प्रति नग (wipro) | (दर जकातसह व विक्री करात डिक्लॅरेशन फॉर्म रु. २८,०००/- प्रति नग (HCL Make) |
| २ | डेस्क जेट प्रिंटर | रु. १०,९७५/- प्रति नग (दर सर्व करासह (HP 5748) | रु. ८९३३/- प्रति नग (दर सर्व करासह (HP 5748) | रु. ९५००/- प्रति नग (दर सर्व करासह (HP 5748) | रु. ९६५०/- प्रति नग (दर सर्व करासह (HP 5748) | रु. ७९००/- प्रति नग (दर सर्व करासह (HP 1200) |
| ३ | सी.डी. रायटर | रु. १७७५/- प्रति नग (दर सर्व करासह (samsung) | रु. १७२५/- प्रति नग (दर सर्व करासह (samsung) | रु. १८६५/- प्रति नग (दर सर्व करासह (samsung) | रु. १७९०/- प्रति नग (दर सर्व करासह (samsung) | रु. १४५५/- प्रति नग (दर सर्व करासह (HCL Make) |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मे. एच.सी.एल. एन्फोसिस्टिम लि. यांचे निविदेतील दर सर्वात कमी व बाजार भावाशी तुलना केली असता वाजवी आहेत. सदरकामी सर्वात कमी दराच्या निविदा स्विकारणेस मा. आयुक्त सो. मंजुरी दिलेली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार अवलोकन करुन ही सभा मंजूरी देत आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १३८ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १३८ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. १४२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या विभागीय कार्यालया मार्फत शहरामध्ये अळी नाशके, किटक नाशके फवारणी करण्यात येत असते. दि. २६/७/२००५ व २७/७/२००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्याप्रमाणात पुरपरिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे साथीचे रोग पसरण्याची शक्यता असल्याने तसेच गणपती उत्सव येत असल्याने याकामी शहरात मोठ्याप्रमाणावर अळी नाशके, किटक नाशके पावडर फवारणी करणे गरजेचे होते. या कामी आवश्यक लागणारी किटक नाशके, अळी नाशके पावडर तातडीने खरेदी करणे कामाची दि. ३०/८/२००५ रोजी मा. आयुक्त यांनी मंजूरी प्राप्त झाल्यानुसार अळी नाशके, किटक नाशके खरेदी कामाच्या दि. ९/९/०५ रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. मुदतीत आलेल्या निविदेतील दरांचा लिफाफा उपस्थित निविदाकार व निवड समिती यांच्या समक्ष दि. १४/९/२००५ रोजी उघडण्यात आला. त्यानुसार निविदाकारांनी खालीलप्रमाणे दर सादर केले आहेत.

| क्र. | जंतू नाशकाचे नाव | मे. रमेश अॅग्रो केम कॉर्पोरेशन | मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन | श्रीराम अॅग्रो | मे. प्रोटेक्ट |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Malathion 5% D.P W.H.O grade | रु. २१/- प्रती किलो | रु. २१.३० प्रती किलो | रु. २०.९० प्रती किलो | **रु. १५/- प्रती किलो** |
| 2 | Chlorpyrifos Mythyl 40% E.C. As per W.H.O specification | रु. १३९०/- प्रती लिटर | रु. १३९७/- प्रती लिटर | रु. १४२०/- प्रती लिटर | **रु. १०७५/- प्रती लिटर** |
| 3 | Neemtex 300 PPM | रु. २४६०/- प्रती ५ लिटर | **रु. ४८०/- प्रती लिटर** | रु. ४९०/- प्रती लिटर | रु. ३७५/- प्रती लिटर |

वरीलप्रमाणे दरांचा तुलनात्मक तक्ता पाहता मे. प्रोटेक्ट यांनी १) Malathion 5% D.P W.H.O grade पुरवठा कामी रु. १५/- प्रती किलो २) Chlorpyrifos Mythyl 40% E.C. As per W.H.O specification पुरवठा कामी र १०७५/- प्रती लिटर असे सर्वात कमी दर सादर केले आहेत.

Neemtex 300 PPM हे किटक नाशक पुरवठा करणे कामी निविदा अर्जामध्ये अटीशर्तीनुसार मे. प्राटेक्ट यांनी Neemtex 300 PPM किटक नाशक उत्पादक कंपनी अथवा अधिकृत विक्रेता असल्याचा दाखला जोडणे बंधनकारक आहे. मात्र मे. प्रोटेक्ट यांनी सदरचा दाखला जोडला नसल्याने तसेच जरी मे. प्रोटेक्ट यांचा दर रु. ३७५/- प्रती लिटर सर्वात कमी असला तरी या कामी निविदेतील अटीशर्तीनुसार कागदपत्रांची पुर्तता केली नसल्याने मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन यांनी Neemtex 300 PPM हे किटक नाशक खरेदी कामी निविदा अटीशर्तीनुसार आवश्यक ती सर्व कागदपत्रांची पुर्तता केली असून त्यांनी सादर केलेला रु. ४८०/- प्रती लिटर दर जास्त वाटत असल्या कारणाने संबधीत निविदाकाबरोबर वाटाघाटी करून मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन यांनी Neemtex 300 PPM रु. ४६०/- प्रती लिटर असा दर सादर केला आहे. मे. प्रोटेक्ट व में. डॉल्फीन सेल्स कार्पोरेशन यांच्या कडून किटकनाशके व पावडर खरेदी करणेस व याकामी येणा-या रु. ९,४३,०००/- खर्चास मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

सदरच्या प्रस्तावाचे मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १३९ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १३९ :-**

मा. आयुक्त सोा. यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. १४३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे क्षेत्रफळ ७९ चौ. कि.मी आहे. महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर पडीक जमिन असल्याने त्याठिकाणी पावसाळ्यात सखल भागात पावसाचे पाणी साचून डबकी, तळे तयार होतात. सदर डबक्यात साठलेल्या पाण्यात डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणावर वाढत असते. डास उत्पत्ती स्थळांवर मोठ्या प्रमाणात अळी नाशके वापरुन डासांच्या अळ्या नष्ट करणे गरजेचे आहे. मलेरिया लार्वीसाईड ऑईल हे अळी नाशक म्हणून मोठ्या प्रमाणात उपयुक्त आहे.

एम.एल.ओ. या अळी नाशकाची मे. इंडियन ऑईल कंपनी असून सदन कंपनीने मलेरिया लार्वीसाईड ऑईल विक्रि करणे कामी कोणताही अधिकृत विक्रेता अथवा एजंट नेमलेला नाही. मलेरिया लार्वीसाईड ऑईल खरेदी कामी इंडियन ऑईल कंपनी यांचेकडून दि. २९/८/२००५ रोजी दर पत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार महापालिकेने मे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन यांचेकडून १०००० लिटर मलेरिया लार्वीसाईड ऑईल खरेदी कामी रु. ३,३६,३७८/- एवढा खर्च आला असून त्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) अन्वये मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

सदरच्या प्रस्तावाचे मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १४० चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. १४० :-**

मा. आयुक्त सोा. यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. १४४ :-**

दि. २६ व २७ जुलै रोजी व त्यानंतर झालेल्या अतिवृष्टीचे काळात महानगरपालिका क्षेत्रात अनेक विभागात पाणी साचले होते. महानगरपालिका क्षेत्रातील बहुतेक इमारतीच्या जमिनीवरील पिण्याचे पाण्याच्या टाकीत दुषीत पाणी मिसळले होते.

अतिवृष्टीमुळे साचलेल्या पाण्यातूतन कित्येक नागरीक मुंईहून चालत आलेले होते. अतिवृष्टीमुळे उद्भवलेल्या परिस्थितीमुळे महानगरपालिका क्षेत्रात हगवण, अतिसार, उलटी जूलाब, कावीळ, लेप्टोस्पायरोसिस, डेंग्यू, मलेरिया आजार पसरण्याची शक्यता होती.

सदरचे आजरावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे व रुग्णांवर औषेधोपचारासाठी मोठ्या प्रमाणात औषधांची आवश्यकता होती. सदरची औषधे तातडीने खरेदी करावयाची होती. औषधी कंपन्याची अनेक गोडावून्स पावसाचे पाणी साचल्यामुळे खराब झालेली होती व आवश्यक त्या औषधांचा बाजारात तुटवडा होता अशा परिस्थितीत उपलब्ध ठिकाणाहून औषधे खरेदी करणे गरजेचे होते. या कालावधीत खालीलप्रमाणे तातडीने मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम ६७, ३(क) अन्वये आयुक्तांचे अधिकारात औषधे खरेदी केलेली आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) शाह फार्मा, स्टेशन रोड, भाईंदर पश्चिम | - | रु. ९३,८६४/- |
| २) राजेश मेडिकल सर्व्हीस, फार्मास्युटीकल डिस्टी | - | रु. २६,०७५/- |
| ३) सागर इंटरप्रायजेस फॉर्मास्युटीकल डिस्टीब्युटर्स कोळीवाडा, दत्त मंदिर रोड, ठाणे | - | रु. २,०७,८८१/- |
| **एकुण** | - | **रु. ३,२७,८२०/-** |

अतिवृष्टीनंतर महानगरपालिका क्षेत्रात वेगवेगळ्या विभागात मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती, स्थायी समिती, मा. सभागृह नेता, मा. विरोधी पक्ष नेता, गट नेते, सन्मा. नगरसेवक, राजकीय पक्ष व नागरीकांचे सहभागातून दि. ३/८/२००५ ते १६/९/२००५ पर्यंत शिबीरे आयोजीत केलेली होती. त्यातून व महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रातून आणि फिरत्या दवाखान्या मार्फत ४५,३०५ नागरीकांवर औषोधोपचार करण्यात आले.

सदर प्रकरणी मा. आयुक्त यांचे अधिकारात केलेला खर्च रु. ३,२७,८२०/- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ ३(क) नुसर औषधे खरेदी केलेल्या खर्चस हि सभा मंजूरी देत आहे.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित असलेले सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि मनपा कर्मचारी वर्ग आपण सर्वांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्याबद्दल सर्वांचे आभार मानतो. तसेच, सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा देउन सभा संपल्याचे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ : दुपारी ०१.०० वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**